शनिवार, २६ नोव्हेंबर २०२२
किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी · दैनिक
वर्ष - ०२ · अंक -१०५
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SATURDAY 26 NOVEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-105 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-10 ● PRICE-5

# अफूच्या गोळीसारखा धर्माचा वापर

## छगन भुजबळ : अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेची आढावा बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ : राज्यात थोरपुरुषांबाबत अवमानानाकारक उद्गार काढणारे सत्तेत आहेत. जाणीवपूर्वक असा भ्रम पसरविला जात आहे. सत्ताधारी आपले अपयश लपविण्यासाठी व सत्ता टिकविण्यासाठी जाती-धर्माचा अफुच्या गोळीसारखा वापर करीत आहेत, अशी टीका छगन भुजबळ यांनी केली. शुक्रवारी यवतमाळ येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेची आढावा बैठकीत ते बोलत होते.**

भुजबळ पुढे म्हणाले की, जनतेला या नशेत ठेवून स्वतःची सत्ता राखण्याचा खटाटोप सुरू आहे. ओबीसीची स्वतंत्र जणगनणा व्हावी ही मागणी आजही पूर्ण झालेली नाही. या उलट ओबीसींच्या आरक्षणाला भाजपातीलच काही मंडळींनी 2027 मध्ये सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. समता परिषदेच्या माध्यमातून ओबीसींचा हक्क कायम रहावा, स्वतंत्र जनगणना व्हावी या मागणी घेवून सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की, ओबीसींच्या आरक्षणाबाबत न्यायालयाने इम्पीरिकल डाटाची मागणी केली. 2016 मध्ये हा डाटा केंद्रातील मोदी सरकारच्या ताब्यात देण्यात आला. त्यात काही चुका असल्याचे सांगितले गेले.

मात्र याच डाटाच्या आधारे उज्वला गॅस योजना, घरकुल योजना राबविल्या. इतकेच नव्हे तर रोहिनी कमिशनलाही हा डाटा उपलब्ध करून देण्यात आला. मात्र महाराष्ट्रातील महाविकास आघाडी सरकारने केंद्राकडे या डाटाची मागणी केली असता तो डाटा देण्यात आला नाही. 2021 मध्ये कोरोना महामारीमुळे जनगणना झाली नाही. अशा अनेक अडचणी मागासवर्गीयांच्या बाबत जाणीवपूर्वक उभ्या केल्या जात आहे. आता शिक्षणातही धार्मिकीकरणाचा प्रयत्न सुरू आहे. ही बाब लोकशाहीला बाधक ठरणारी असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. ते म्हणाले की, विद्यापीठातही सोईची लोक बसविण्याचा सपाटा सुरू असल्याचे छगन भुजबळ यांनी सांगितले.
बहुजन समाजाला अंधश्रद्धेच्या गर्तेतून बाहेर येण्याची गरज आहे. तरच अपेक्षित हक्क व विकास साधता येईल, असेही छगन भुजबळ म्हणाले. विदर्भातील शेतकऱ्यांच्या समस्या, महागाई, बेरोजगारी या विषयाला घेवून राष्ट्रवादी मोर्चाचे आयोजन करणार आहे. हा मोर्चा नागपूर येथे विधिमंडळ अधिवेशनावर धडक देणार आहे. या माध्यमातून सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न असल्याचे भुजबळ यांनी सांगितले.




## अमेरिकेतील आधुनिक केसरीचे वाचक लिहितात...



आधुनिक केसरी

आदरणीय संपादक महोदय, दैनिक आधुनिक केसरी औरंगाबाद यांसी अनंत गोविंदराव पवार यांचा सस्नेह नमस्कार. महोदय. आज दि. २५ नोव्हेंबर २०२२चा आधुनिक केसरीचा ऑनलाइन अंक वाचला. सर्वप्रथम आधुनिक केसरी आणि आपले धन्यवाद. कारण आम्ही संपूर्ण कुटुंब सध्या अमेरिकेतत आहोत. आपला आजचा दैनिक आधुनिक केसरीचा अंक वाचण्यासाठी उघडला आणि लगेच लक्ष गेले ते सुंदर फुलांची सजावट आणि अप्रतिम फोटोकडे. आमचे कुलदैवतदेखील श्री खंडोबाच आहे. आमच्या कुलदैवताचे दर्शन झाले. आम्हा संपूर्ण परिवाराचे मन प्रसन्न होऊन गेले. खूप आनंद झाला. आपल्या दैनिक आधुनिक केसरीमुळेच आम्हा सगळ्यांनाच USA ला दर्शन घेता आले. त्याबद्दल धन्यवाद. आपल्या आधुनिक केसरीचा मी व्यक्तीश: खूप ऋणी आहे. मी अनंत गोविंदराव पवार, प्लॉट नं. ३६, एन ३ येथील रहिवासी, ऑनलाइन दैनिक आधुनिक केसरीचा नियमित वाचक आहे. मी २०१७ मध्ये महाराष्ट्र राज्य पणन महासंघ मुंबई येथून सरव्यवस्थापक या पदावरुन निवृत झालेलो आहे. माझा मुलगा शन्तनू आणि मुलगी अंकिता दोघे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबादचे विद्यार्थी होते. येथे एम. एस. करून मुलगा ॲमेझॉन तर मुलगी aapfolio मध्ये प्रोडक्ट मॅनेजर आहे. जावई डॉ. अर्पित गुप्ता आयआयटी रूरकी चे बीटेक असून प्रिन्स्टन विद्यापीठातून पीएच. डी. केले आहे. युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, सांता बार्बार येथे संगणक विज्ञानाचे प्राध्यापक आहेत. असो. मी आपल्या दैनिक आधुनिक केसरीचा नियमित वाचक असून, आजचे आपले दैनिकामधील छायाचित्रकार सुधीर कोर्टीकर यांचे मनापासून खूप खूप धन्यवाद. सुधीर कोर्टीकरांचे लेखही आम्ही सारे जण वाचतो. ते लेखक म्हणून ठाऊक होते. आज ते चांगले छायाचित्रकार आहेत हेही समजले. त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो. आपल्या दैनिक आधुनिक केसरीचे ऋण व्यक्त करून थांबतो.

**आपल्या आधुनिक केसरी दैनिकाचा एक वाचक**
**अनंत गोविंदराव पवार**

## केंद्राकडे 3000 कोटींचा अतिरिक्त प्रकल्पांसाठीचा प्रस्ताव : फडणवीस

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** केंद्रीय अर्थमंत्र्यांच्या उपस्थितीत नवी दिल्ली येथे आज शुक्रवारी झालेल्या केंद्रीय अर्थसंकल्प : 2023-24 पूर्व बैठकीत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य 2021-22 च्या 15 हजार कोटींहून आर्थिक वर्ष 2022-23 साठी 1 लाख कोटी रुपये इतके वाढवून दिल्याबद्दल केंद्र सरकारचे विशेष आभार मानले. याशिवाय महाराष्ट्र सरकारने सुमारे 3000 कोटी रुपयांचा अतिरिक्त प्रकल्पांसाठीचा प्रस्ताव सादर केलेला आहे, त्याला मंजुरी प्रदान करण्यात यावी. यामुळे राज्याच्या आर्थिक विकासाला गती मिळेल, असे फडणवीस म्हणाले. यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की, 2017- 18 ते 2020-21 या आर्थिक वर्षांचे जीएसटी कम्पेन्सेशन महाराष्ट्राला प्राप्त झालेला आहे. 2021-22 या आर्थिक वर्षासाठी तसेच 2022-23 च्या पहिल्या तिमाहीसाठी हंगामी कम्पेन्सेशन प्राप्त झालेले आहे, त्याही बद्दल आभार. उर्वरित कालावधीसाठी सीएजी सर्टिफिकेशनची प्रक्रिया सुरू आहे. प्रधानमंत्री गतिशक्ती योजना ही अतिशय चांगली सुरूवात आहे, असे सांगतानाच लॉजिस्टिक क्षेत्रासाठी आगामी अर्थसंकल्पात आर्थिक सलवती देण्यात याव्यात, अशी मागणी देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केली. केंद्रीय भविष्य निर्वाह निधीत योगदानासाठी आर्थिक सहाय्य करता आले तर एमएसएमई क्षेत्रात रोजगाराच्या व्यापक संधी निर्माण होतील. आयर्न ओर आणि कॉन्सनट्रेटस यावरील एक्साईज ड्युटीत केलेली वाढ मागे घेतल्याबद्दल देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र सरकारचे आभार मानले. यासंदर्भातील मागणी त्यांनी पत्र पाठवून केली होती. विपुल खणिज संपदा असलेल्या कोकणासारख्या क्षेत्राच्या अर्थकारणाला त्याचा मोठा लाभ होईल.



## भुयार खोदून केली रेल्वे इंजिनची चोरी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** भारतासारख्या खंडप्राय देशामध्ये नागरिकांच्या सोयीसाठी रेल्वेचे विस्तीर्ण जाळे तयार करण्यात आलेले आहे. भारतीय रेल्वे देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत जाऊन पोहचली आहे. आजही लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी नागरिक रेल्वेला प्राधान्य देतात. रेल्वेतून प्रवास करताना बोगीच्या आतमध्ये किंवा स्टेशनवर विविध सूचना लिहिलेल्या तुम्ही नक्कीच पाहिल्या असतील. 'रेल्वेची संपत्ती तुमचीच संपत्ती आहे. कृपया तिची काळजी घ्या', अशा कितीतरी सूचना बोगीच्या आतमध्ये ठिकठिकाणी लिहिलेल्या असतात. या सूचना बिहारमधील काही चोरट्यांनी जास्तच गांभीर्यानं घेतल्याचं दिसत आहे. या चोरट्यांनी रेल्वे आपली स्वतःचीच संपत्ती असल्याप्रमाणे रेल्वेच्या इंजिनासह अनेक पार्ट्स चोरण्याचा धडाका सुरू केला आहे. एका घटनेमध्ये तर रेल्वे इंजिनच्या चोरीसाठी चोरट्यांनी बरौनी ते मुझफ्फरपूरपर्यंत एक भुयार खोदल्याचे उघड झाले आहे. बरौनी ते मुझफ्फरपूर हे अंतर जवळपास 100 किलोमीटर आहे.


# शहाद्यात साकारतेय भारतातील एकमेव अष्टधातूंची शेषशायी विष्णू मूर्ती

## श्री श्री नारायणपूरम तीर्थ : मूर्तीचे वजन २१ टन, उंची ११ फूट

आधुनिक केसरी न्यूज

पल्लवी प्रकाशकर

**शहादा :** संतश्री लोकेशानंदजी महाराज यांच्या विचारातून वास्तवात साकार होत आहे भव्य शेषशायी भगवान विष्णू मूर्ती, वजन २१ टन, उंची ११ फुट असे भव्य दिव्य अलौकिक श्री विष्णू स्वरुप लवकरच सर्व विष्णू भक्तांना दर्शनाने सुखावणारे आहे. नंदुरबार जिल्ह्यात साकारणारे श्री श्री नारायणपूरम तीर्थ भारतभरातील विष्णू भक्तांसाठी भक्ती पर्वणीच ठरणार आहे. संतश्री लोकेशानंदजी महाराजांचा जन्म इंदौर येथील ब्राम्हण परिवारात झाला.वयाच्या अवघ्या १३व्या वर्षी संतश्री लोकेशानंदजी महाराज यांना भक्ती बोध झाला आणि त्यांनी घर परिवार त्याग करून थेट सदगुरु श्री अच्युतानंद जी महाराजयांच्या मार्गदर्शनाखाली नारायण भक्ती तपस्या सुरु केली. अनेक वर्षे तप साधना करत भारतभरातील वनात त्यांनी वास्तव्य केले. सदगुरु श्री अच्युतानंद जी महाराज यांच्या प्रेरणेने संतश्री लोकेशानंदजी महाराज यांनी श्री नारायण भक्ती पंथ स्थापनेचा संकल्प घेऊन, भव्य दिव्य शेषशायी भगवान विष्णू मुर्ती स्थापनेचा महान संकल्प घेतला. तेव्हापासून श्री नारायण भक्ती पंथाची सर्वत्र महती प्रसिद्ध होई लागली. मंदिर निर्माण साठी योग्य व शास्त्रोक्त जागेची निवड नर्मदा-तापी या नद्यांच्या मध्य असलेले क्षेत्र धर्मानुकुल मानले जाते . यामुळे शहादा शहरा लगत लोणखेडा खेतिया बायपास रस्ता जवळील ,तीन राज्यांच्या सीमा असलेल्या आणि तापी नदी जवळ असलेले क्षेत्र या महान श्री श्री नारायण पुरम तीर्थ मंदिरासाठी निवडण्यात आले. श्री श्री नारायण पुरम तीर्थ मंदिरात विराजीत होणार्या शेषशायी भगवान विष्णू मुर्तीचा निर्माण हा शास्त्रोक्त प्रमाणानुसार ११फुट आहे. सर्व प्रथम मातीपासुन शास्त्रोक्त प्रमाणानुसार श्री विष्णू मुर्ती बनविण्यात आली.तद्रंतर हे शास्त्रोक्त प्रमाण फायबर मॉडेल मधे बनविण्यात आले आहे. संपूर्ण मुर्ती निर्माण कार्य हे संतश्री लोकेशानंदजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत बनविले असल्याचे श्री नारायण भक्ती पंथाच्या सेवेकरींनी सांगितले आहे. मूळ अष्टधातूचे शेषशायी नारायण विष्णू भगवान मुर्तीचे सौंदर्य पाहुन भक्त अचंबीत होत आहेत. अलौकीक तेज असलेल्या या विशाल मुर्ती च्या नाभीतुन भगवान ब्रम्हा तर उजव्या हाता जवळ भगवान शंकर विराजमान आहेत. सुदर्शन चक्र, शंख, गदा, पद्म, सेवेत हनुमानजी सहित गरुडजी ही विराजीत आहेत. माता लक्ष्मीचे स्थान हे भगवान विष्णू च्या हृदयात असते..परंतु या श्री श्री नारायण पुरम तीर्थ मंदिरात भगवान शेषशायी विष्णू यांच्या मुर्ती सहित माता लक्ष्मी यांची मुर्ती स्थापन होणार असल्याचे श्री नारायण भक्ती पंथाच्या सेवेकरींनी कळविले आहे. वेद -शास्त्र- श्लोक वर्णन आधारीत मंदिर संरचना विशेष शास्त्रात उल्लेख असलेल्या पक्षी राज गरुड प्रासाद यानुसार श्री नारायण पुरम तीर्थ मंदिराचे शास्त्रोक्त निर्माण कार्य शहादा येथे सुरू आहे. पक्षी राज गरुड प्रासाद हे विष्णू भगवान यांच्या पंच प्रिय प्रासाद मधील एक आहे.याचे वर्णन पुराण श्लोकांमधे आढळते. अष्टधातू पासुन निर्मीत श्री शेषशायी भगवान विष्णू मुर्ती मुख्यतः इंदौर (म.प्र.) आणि जयपूर (राज)येथील कुशल कारागीरांच्या हस्ते संतश्री लोकेशानंदजी महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली निर्माण होत आहे. २१हजार किलो वजनाच्या ह्या भव्य मुर्तींचे निर्माण कार्य अंतीम टप्प्यात आले असल्याची माहिती संतश्री लोकेशानंदजी महाराज यांनी दिली.






**या विष्णू भक्तांनी घेतला पुढाका**

शहादा येथील श्री श्री नारायण पुरम तीर्थ मंदिर निर्माण कार्यासाठी श्रीजीतेश जी कुमावत उदयपूर ( राज ) , श्रीअजय हरिनाथ सिंह जी मुंबई ( महा), श्रीमान नितिन अग्रवाल जी इंदौर ( म .प्र . ), श्रीमान शांतिलाल पटेल शहादा ( महा), यांनी तन मन धनाने स्वत : ला श्री नारायण भक्ती पंथासाठी वाहुन घेतले आहे . महाराष्ट्रातील विष्णू भक्तांनी शहादा येथील श्री श्री नारायण पुरम तीर्थ मंदिरात प्रत्यक्ष भेट देऊन मंदिर निर्माण कार्यात सहभागी होण्याचे आवाहन सद्गुरू संतश्री लोकेशानंदजी महाराज यांनी केले आहे .







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


## स्वामीकृपा

आधुनिक केसरी

मागच्या वेळेप्रमाणे यावेळीही रेश्माने मानवसेवा महत्वाची मानून स्वामींसाठी केलेले लाडू त्या व्यक्तीला नेऊन दिले. आता मात्र तिचे मन तिला खात होते. आपल्या हातून स्वामींची अपेक्षित सेवा घडली नाही याची तिला खंत होती. रंजनाताईंजवळ तिने मोकळे केले. त्या पुन्हा म्हणाल्या, ' स्वामी खूप दयाळू आहेत. ते रागावत नाहीत. तू अडलेल्याला मदत केलीस याचा त्यांना आनंदच होईल. ' आता मात्र पुढच्या गुरुवारी स्वामींचा नैवेद्य चुकू द्यायचा नाही असे तिने मनोमन ठरवले. आता स्वामीकृपेने रेश्मा आणि नितीनचा संसार सुखात चालला होता. लवकरच गुरुवार आला. आता तिने स्वामींना नैवेद्य म्हणून मागच्या गुरुवारचे मेथीचे आणि डिंकाचे मिळून एकत्र लाडू बनवून अर्पण करायचे ठरवले. आजच तिला एक वाजता एका ठिकाणी मिटिंगसाठी जायचे होते. त्या ठिकाणी तिला एक ऑर्डर मिळणार होती. शिवाय संध्याकाळी पाच वाजता देखील एका ठिकाणचे बोलावणे



आले होते. त्या ठिकाणी देखील काही ऑर्डर मिळण्याची शक्यता होती. सकाळी लवकर उठून तिने घाईघाईने सगळी कामे आवरली. नितीनला डबा तयार करून दिला. आणि स्वामींना नैवेद्य दाखवून पुढे तसेच मीटिंगला जाण्याच्या दृष्टीने तयारी केली. आता साडेअकरा झाले होते. घाईघाईत तिने आपली बॅग उचलली आणि घराला कुलूप लावून बाहेर पडली. आज ठरल्याप्रमाणे स्वामींना आपण नैवेद्याचे लाडू अर्पण करणार याचा तिला कोण आनंद झाला होता. तिथे गेल्यानंतर तिने स्वामींना नैवेद्य ठेवण्यासाठी आपली बॅग उघडली आणि तिला धक्काच बसला. तिला लक्षात आले की आपण निघण्याच्या घाईत तो लाडवांचा डबा किचन ओट्यावरच विसरून आलोय. तेवढ्यात एक आजी तिथे आल्या. त्या आजीनी स्वामींना नैवेद्य म्हणून मेथीचे आणि डिंकाचे लाडू आणले होते. मग स्वामींना त्या लाडवांचा नैवेद्य दाखवण्यात आला. मग आरती होऊन तेथे जमलेल्या उपस्थिताना प्रसाद वाटण्यात आला. स्वामींजवळ जे डिंक आणि मेथीचे लाडू नैवेद्य म्हणून ठेवले होते, ते रंजनाताईंनी उचलले. **क्रमशः**



## आनंदी पहाट

### सुखद आठवणींना उजाळा देत राहावे

आधुनिक केसरी

आपल्यापैकी प्रत्येकांत काही उणिवा असतातच, उणिवा नसणारी व्यक्ती सापडणे सद्यःस्थितीत विरळाच; त्याचा शोधही न घेतलेला बरा. कारण व्यक्ती तितक्या प्रकृती, त्यांत काहींमध्ये संकृतीचे तर काहींमध्ये काही विकृतीचे दर्शन आपल्याला घडत असते. अर्थातच कोणत्याही विकृतीची स्वीकृती आपण सहसा करत नाही, पण आपल्या संकृतीला आणि आपापल्या प्रकृतीला साजेशी एखादी कलाकृती ठरेल अशी कृती करण्याची आपल्याला जाणीव काहीवेळा का होत नाही? कालच्या काही उणिवा कुरवाळत बसण्यात आपण धन्यता मानतो, सतत उणिवांचीच, समस्यांचीच, दःखाचीच सर्वत्र आणि सातत्याने चर्चा करत राहतो. आजच्या आपल्या आणि इतरांच्या जाणीवा जपण्याच्या दृष्टीकोनातून आपण खरंच गांभीर्यानं विचार करतोच असे नाही. आपल्या बुद्धिवादी जीवाला कालच्या उणिवा दूर करून, आजच्या जाणीवा जपून त्यांना नेणीवेपर्यंत नेण्याची आज खरी गरज आहे. ह्यासाठी आपल्या प्रत्येकाचेच विचार, वर्तन आणि व्यवहार हे स्वतः पुरते मर्यादित न ठेवता इतरांच्या उणिवा दूर करून, त्यांच्या जाणीवा जपून त्यांना नेणीवेपर्यंत नेण्याच्या कामी यायला हवेत. आपल्या गत आयुष्यात रममाण व्हायला आपल्याला प्रत्येकालाच हवे असते, ते अधिक प्रियही असते. आपल्या प्रत्येकाच्याच साठवणीतल्या अनेक आठवणी असतात. हर्षाच्या-स्पर्शाच्या, घरच्या-दारच्या, प्रीतीच्या-मैत्रीच्या, स्पर्धेच्या-बक्षिसांच्या, शाळेच्या-कॉलेजच्या, बालपणीच्या-तारुण्याच्या; अशा एक नाही तर अनेकविध आठवणीत आपल्या अंतर्मनाला सुखावण्यासाठी अनेकदा त्या आपण स्मरत असतो. ह्यांत काही आठवणी सुखाच्या-दुःखाच्या, रागाच्या-वादाच्या, विरहाच्या-प्रहाराच्या, प्रयासाच्या-त्रासाच्या, मानाच्या-अपमानाच्या अशा मिश्र स्वरूपाच्याही असतात. अनेकदा काही घटना आपण कितीही आठवायच्या ठरवल्या तरीही नीट, पूर्णपणे आठवता येतातच असे नाही; तर काही घटना मात्र अनावधानाने, आपोआप आपल्या डोळ्यासमोर पुनःश्च यायला लागतात.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### करतो सांभाळ | पांडुरंग ||

कुणाच्या कारणे | वेदना कुणाला ||
उगाच जीवाला | तळमळ ||१||
असे सदाचार | ज्याचा नित्य नेम ||
यातनाच ठाम | त्याचे भाळी ||२||
सात्विकाचे जिने | बोचते का जना? ||
दांभिक सज्जना | छळतसे ||३||
ज्याच्या मना नाही | विकारांचा दंश ||
जाण तोचि वंश | ज्ञाना-तुका ||४||
रामकृष्ण हरि | भजे सर्वकाळ ||
करतो सांभाळ | पांडुरंग ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरुपण"

आधुनिक केसरी

### विनवणी

अंबे आता कोणी नाही। तुझ्यावीण माझा त्राता।
नको नको फिरवू कुठे। देई पायी जागा आता।।
दाविलेसी जगरूपा। मारितसे ते गं थापा।
माते दाखविसी जगा। तुझ्या कृपे मी सनाथा।
चंद्रहास म्हणे माये। घेई कडेवरी आता।।



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## ।। दासबोध स्तवन ।।

### ब्रम्हनिरूपण

आधुनिक केसरी

आपण 35 व्या ओवीपर्यन्त आलो होतो. संपूर्ण देहाला पूरून उरते ती देहबुद्धी होय.आयुष्य आहे तोपर्यंत मी हे केले मीते केलं मी अमुक करणार असं न संपणार संसाराचा गाडा पुढे ढकलत न न्यायचा असतो तो ही आनंदाने सत्कर्म करत सत्कारणी लावायचा असतो. हे करत असताना देहाला भलतेच महत्त्व प्राप्त झालेले असते. देहाच्या पलीकडे जाऊन जीवाचे कल्याण करावे यासाठी संत जवळ करावे लागतात. देहबुद्धी विलक्षण क्षीण असते ती योगी महायोगी हटयोगी यांनाही त्रास देते.देहबुद्धी नको कारण परमार्थ साधनेत देहबुध्दीतील हेवेदावे अहंभाव हा अडसर बनतो.खरतर मूलतः जीव ब्रम्हस्वरूप असून सुध्दा केवळ अहंकाराने त्याला सद्वस्तूमध्ये मिसळता येत नाही.

समर्थ सांगतात की,परमात्मवस्तु अगदी एकच आहे परंतू तिच्या अनुभवामध्ये दोन गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे. ब्रम्ह अनंत आहे अनंत गुण,अनंत शक्ति त्याच्या ठायी वास करतात. प्रत्येक माणसाची मनोरचना भिन्न असल्याने ब्रम्हाचा अनुभव प्रत्येकाला वेगवेगळा येतो. कोणाला अनंत वाटतो,कोणाला अलिप्त वाटतो,निवांत वाटतो,कोणाला सर्वज्ञ वाटतो,कोणाला तो सत्ताधीश वाटतो. ज्या ज्या पातळीवर त्याला ब्रम्ह भेटतो त्या त्या पातळीवर तो त्याचे वर्णन करतो.ब्रम्ह नादरूप,ज्योतीरूप,साक्षिरूप,चैतन्यरूप आहे असे सांगतात. जसे चंद्रसुर्य एकच आहेत कवींना ते काव्यमय वाटतात शास्त्रज्ञांना ते खगोलीय स्थिती आहे असे वाटते. तसे ब्रम्ह एकचं आहे माणसाची मनोरचना वेगवेगळी आहे त्यामुळे त्याला वेगवेगळे ब्रम्हतत्व दिसते. वास्तविक ब्रम्ह नामरूपाच्या पलीकडे आहे. ते निर्मल,निश्चल,अत्यंत शांत स्वतः च्या आनंदात रममाण असते. ब्रम्हनादरूप,ज्योतीरुप,चैतन्यरूप,सत्तरूप,साक्षीरूप,स्वस्वरूप आहे. ते शुन्य सनातन सर्वेश,सर्वज्ञ,,सर्वात्मा व जगाचे जीवन आहे. तो सदोदीत, सहज, शुध्दबुध्दीचे, सर्वातीत,शाश्वत व सत्य आहे. ते विशाल आहे विस्तीर्ण आहे. विश्वात्मक आहे.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## || संस्कारकर्मांचा मूळ हेतू ||

आधुनिक केसरी

धार्मिक संस्कार फार चांगले असतात, कारण त्यांनी आपल्या मनाला वळण लागते. प्रत्येक धर्मामध्ये संस्कार असतातच. ज्या मनुष्याला संस्कार नाही तो कोणत्याच धर्माचा नाही; मग तो आस्तिक असो वा नास्तिक असो. खरे म्हणजे कोणतेच कर्म यथासांग घडत नसते; पण त्यातल्या त्यात, संस्कारकर्म मनुष्याने शास्त्राप्रमाणे करावे. त्यामध्ये जिथे कमी पडेल तिथे भगवंताचे स्मरण करावे, कारण भगवंताची श्रद्धा वाढावी हाच संस्काराचा मूल हेतू आहे. संस्कार करीत असताना जरूर असलेला धार्मिक विधी तर करावाच, पण ज्यांना आपल्याविषयी प्रेम आहे असे, आणि आपल्याला ज्यांच्याविषयी प्रेम आहे असे जे लोक आहेत, त्यांना जेवायला बोलवावे. लौकिक मात्र वाढवू नये. वाईट ते सोडणे आणि चांगले ते धरणे हाच संस्काराचा मुख्य हेतू. संस्कार हे भगवंताचे स्मरण करून देतात. समाज हा बंधनाशिवाय राहूच शकत नाही. 'आम्हाला बंधने नकोत' असे म्हणणारे लोक वेडे आहेत. बंधनामुळेच आपल्या धर्माला सनातनत्व आले आहे. म्हणून बंधनांना अतिशय महत्त्व आहे. धर्म हा कधीच बुडत नसून बंधने बुडत जातात. सध्या बंधने बुडत चालली आहेत. पूर्वी धर्मावर श्रद्धा होती, म्हणून इतक्या सुधारणा नसूनसुद्धा स्वास्थ्य होते. पण आज बाहेरच्या जगात पुष्कळ सुधारणा झाल्या तरी त्या सुधारणांना धर्माचा पाया नसल्यामुळे मानवाला स्वास्थ्य नाही. अलीकडे काही लोक असे म्हणतात की, समाज जसा बदलेल तसे नीतीचे नियम बदलायला पाहिजेत. पण अध्यात्मविद्या असे सांगते की, नीतिचे नियम कायमच आहेत. ते न बदलता माणसाने स्वतःलाच बदलले पाहिजे. एखाद्या समाजाचा पाया बौद्धिक असू शकेल किंवा पैसा असेल, पण ज्या समाजाचा पाया धर्म आहे त्या समाजालाच खरे समाधान लाभेल. धर्म म्हणजे एका अर्थाने व्यवस्थितपणाच होय. धर्म समाजाला संस्काराच्या रूपाने धरून ठेवतो. व्यवहारामध्ये ज्याचा उपयोग करता येतो तोच खरा वेदांत होय; आणि जो परमार्थाला उपयोगी तोच खरा आणि योग्य व्यवहार होय. भगवंत आम्हाला हवा आहे असे म्हटले, तरी जग आमच्या आड येत आहे असे आम्हाला वाटते. जग आडवे का येते, तर जगाशी आमचे स्वार्थाचे संबंध आहेत म्हणून, जगाशी वागताना आम्हाला निःस्वार्थीपणाने व्यवहार करण्याची सवय नसल्याने जगाचा मोह आम्हाला सुटत नाही. हे सर्व नाहीसे होण्यासाठी आम्ही निःस्वार्थी बनणे खरोखर आवश्यक आहे. त्यासाठी आम्हाला आमचे मन ताब्यात ठेवता आले पाहिजे, आणि त्याकरिता नाम हेच साधन आहे. जन्माला येऊन काही करणे असेल तर भगवंताला न विसरता कर्मे करावी, म्हणजे झाले.
आजचे बोधवचन आहे : नामात जो प्रपंच करील त्याचाच प्रपंच पूर्णत्वाला जातो.



## अध्यात्म आणि विज्ञान

आधुनिक केसरी

आपल्या अनुभवाला येणाऱ्या अंगाचाच विचार येतो. म्हणजे आत्म्याचे ज्ञाता म्हणून नव्हे, तर ज्ञेय म्हणून ज्ञान मिळविले जाते. हे काम मानसशास्त्रात केले जाते. परंतु आत्म्याच्या ज्ञातृरूपाचे ज्ञान मिळवायचे झाल्यास त्याची पद्धती वैज्ञानिक पद्धतीहून भिन्न असावी लागेल. ते काम करणारे शास्त्र म्हणजे अध्यात्मशास्त्र.
परंतु अध्यात्म म्हणजे आत्म्याविषयीचे ज्ञान असे जरी असले तरी जे आत्मज्ञान आपल्याला प्राप्त होते त्यातून, किंवा ज्या उपायांनी, ज्या पद्धतीने ते प्राप्त होते त्या उपायांनी विश्वाविषयीही ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न केला जातो, आणि म्हणून अध्यात्मशास्त्रात केवळ आत्म्याचेच नव्हे तर अनात्म्याचेही (म्हणजे आत्म्याहून भिन्न अशा जड विश्वाचेही), आणि परमात्म्याचेही ज्ञान मिळते असे मानतात, आणि त्यामुळे सबंध विश्व, त्याचा उत्पत्तिकर्ता, आत्मा आणि परमात्मा यांचा परस्पर संबंध, इत्यादी गोष्टींचीही चर्चा अध्यात्मात होते. म्हणजे ज्याला तत्त्वज्ञान म्हणतात त्याच्या बऱ्याच समस्यांची चर्चा अध्यात्मातही होते. पण तरी 'अध्यात्म' आणि 'तत्त्वज्ञान हे शब्द समानार्थी नव्हेत. अध्यात्मशास्त्रात प्रमुख स्थान आत्म्याला आहे, आणि त्यात प्रामुख्याने आत्म्याचा स्वरूपाविषयी, त्याच्या परमात्म्याशी असणाऱ्या संबंधाविषयी, आणि विश्वातील मानवाच्या स्थानाविषयी विचार असतो. परंतु 'तत्त्वज्ञान' या शब्दाने असा अर्थ व्यक्त होत नाही. एखादे तत्त्वज्ञान अनात्मवादीही असू शकेल; तसेच ते परमात्मा (ईश्वर) न मानणारे, निरीश्वरवादीही असू शकेल; आणि त्याचप्रमाणे ते मनुष्याचे विश्वातील स्थान अतिशय क्षुद्र, उपेक्षणीय आहे असे मानणारेही असू शकेल. पण अध्यात्मात मात्र या विचारांना थारा मिळणार नाही. वैज्ञानिक ज्ञानाहून वेगळे ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न मनुष्य का करतो? याचे कारण समजावून घेण्याकरिता आपल्याला अध्यात्माची मूळप्रेरणा काय आहे ते पाहिले पाहिजे. मनुष्य जेव्हा या अफाट, अनंत स्थलकालात विस्तारलेल्या विश्वाकडे पाहतो, तेव्हा त्याला आपले दौर्बल्य; क्षुद्रत्व फार प्रकर्षाने जाणवते. आपण किती अल्पजीवी, आपली शक्ती किती तोकडी, आपले ज्ञान किती तुटपुंजे यांचे दर्शन घडल्यावर तो भयभीत होतो. सर्वस्वी प्रतिकूल, आपल्या इच्छा-आकांक्षांविषयी सर्वथा उदासीन असणाऱ्या विश्वात आपण कोठून तरी अज्ञानातून येतो, आणि क्षणमात्र येथे राहून कोठेतरी अज्ञानात निघून जातो, या कल्पनेने मनुष्य अतिशय बेचैन होतो. **क्रमशः**

दि. य. देशपांडे

# यशवंतरावांनी रचलेल्या पायावरच आजचा आधुनिक, प्रगत, पुरोगामी महाराष्ट्र उभा

## अजित पवार : यशवंतराव चव्हाण यांच्या स्वप्नातील महाराष्ट्र घडवणे हेच खरे अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** स्वर्गीय यशवंतराव चव्हाणसाहेबांनी रचलेल्या पायावरच आजचा आधुनिक, प्रगत, पुरोगामी महाराष्ट्र उभा आहे. स्वर्गीय चव्हाणसाहेबांचा विचार पुढे घेऊन जाणे आणि त्यांच्या स्वप्नातील महाराष्ट्र घडविणे, हेच त्यांना खरे अभिवादन ठरेल, अशा शब्दात विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांचे स्मरण करुन कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले आहे. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाणसाहेबांनी शेती, उद्योग, व्यापार, शिक्षण, सहकार, सिंचन, आरोग्य अशा अनेक क्षेत्रात महाराष्ट्राच्या विकासाचा भक्कम पाया रचला. कला, क्रीडा, साहित्य, सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध महाराष्ट्र घडवला. नाटक, चित्रपट, गायनासारख्या कलांना प्रोत्साहन दिले.औद्योगिकरण,अर्थकारणाला आश्वासक दिशा दिली. समाजातील मागास, आदिवासी,अल्पसंख्याक, महिला, युवक या समाजघटकांना मुख्य प्रवाहात आणून विकासाची संधी दिली. महाराष्ट्राच्या राजकारण, समाजकारणाला सुसंस्कृत चेहरा दिला असेही अजित पवार म्हणाले.

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचे स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचे योगदान आहे. त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग घेतला. राज्याचे पहिले मुख्यमंत्री आणि नंतर देशाचे संरक्षण, अर्थ, गृह, परराष्ट्रमंत्री, उपपंतप्रधान यासारख्या महत्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या. राजकारण, समाजकारणात कितीही उंचीवर पोहोचले तरी त्यांची नाळ जनतेशी कायम जोडलेली होती. महाराष्ट्रासह देशाच्या राजकारणावर प्रभाव असलेले ते नेते होते. साधी राहणी, कलेवर प्रेम, लेखन, वाचनाची आवड हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य होते असेही अजित पवार यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्रातील अनेक तरुणांमधील नेतृत्वगुण व धडाडी ओळखून त्यांना राजकारणात, समाजकारणात पुढे आणले, संधी दिली. महाराष्ट्राच्या विविध क्षेत्रात कार्य करणारे हजारो कार्यकर्ते त्यांनी घडवले. कृषी, शिक्षण, सहकार, सामाजिक, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रांची जाण असलेले ते दूरदृष्टीचे नेते होते. देशाचे संरक्षणमंत्री म्हणून देशाच्या संरक्षण सज्जतेसाठी त्यांनी केलेले कार्य, दिलेले योगदान देश कायम स्मरणात ठेवेल. त्यांच्या स्वप्नातील महाराष्ट्र घडविणे हेच त्यांना खरे अभिवादन ठरेल अशा शब्दात अजित पवार यांनी त्यांचे स्मरण केले.





## सोयगाव आगाराचा अनागोंदी कारभार; थंडीच्या दिवसांत धावतात एसी बस

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** बस आगारातील बस या जगप्रसिद्ध अजिंठा लेणी मध्ये धावतात या ठिकाणी दोन प्रकारच्या बसेस चालवतात एक साधी बस तिकीट 25 रुपये एक एसी बस तिकीट 30 रुपये शुल्क आकारले जातात व 4 किलोमीटर अंतराचा प्रवास करण्यासाठी सर्रासपणे लूट चालू आहे याकडे मात्र कोणीही दखल घेताना दिसून येत नाही दी:२४ रोजी सायंकाळी 5:15 वाजता लेणी जवळील बस स्थानक वर काही प्रवासी महिला उभ्या होत्या त्यानीं चालक ,वाहक यांना विनंती केली की दादा थंडीच्या दिवसात तुम्ही सायंकाळी एसी बस लावत आहे आमच्या सोबत लहान मुले आहेत तुम्ही 3 वर्षाच्या मुलांचे सुद्धा तिकीट घेतात हा कुठला नियम आहे. साधी बस लावा आम्ही त्या बस मध्ये बसतो तेव्हा एका वाहक ने महिलांना सांगितले ताई ही एसी बस पूर्णपणे सीट भरल्यानंतर आम्ही साधी बस लावणार अशी बेजबाबदार पणाची भाषा करण्यात आली. महिलांना तो पर्यंत उभे राहून साधी बस ची प्रतीक्षा करावी लागली हा प्रकार पर्यटकांन साठी नवीन नाही दररोज अशा प्रकारे पर्यटकांना खूप मोठा त्रास,मनस्ताप सहन करावा लागतो. सोयगाव आगार प्रमुख हिरालाल ठाकरे हे मनमानी कारभार करून थंडीच्या दिवसांत चालक,वाहक यांना AC बस चालवायला सांगतात याला जबाबदार वरिष्ठ अधिकारी सुद्धा आहेत त्यानीं याकडे दुर्लक्ष केलेले दिसून येत आहे.

## उसाला एकरकमी एफआरपी द्या

### स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने निफाड प्रांत साहेबांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज



**निफाड :** उसाला एकरकमी एफआरपी द्यावा, कांदा निर्यातीला चालना देण्यासाठी आखाती देशातील कांदा आयात धोरण रद्द करावे, शेतीसाठी सुरळीत वीजपुरवठा करावा आदी मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने प्रांत कार्यालयात निवेदन दिले असून मागण्यांची दखल न घेतल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राज्य सरकारने एफआरपीचे दोन तुकडे करण्यासाठी ऊसदर नियंत्रण अध्यादेशामध्ये केलेली दुरुस्ती त्वरित मागे घेऊन येणाऱ्या हिवाळी अधिवेशनामध्ये पुन्हा दुरुस्ती करून एकरकमी एफआरपी देण्याचा कायदा करावा. केंद्र सरकारने ६० लाख टन साखरेच्या निर्यातीस परवानगी दिली असून आणखी ३० लाख मे. टन साखर निर्यातीस परवानगी द्यावी. केंद्र सरकारने साखरेची किंमत ३५०० रु. प्रतिक्विंटल निश्चित करून इथेनॉलच्या किमतीमध्ये प्रतिलिटर पाच रुपयांची वाढ करावी. कांदा निर्यातीस चालना देऊन आखाती देशातील कांदा आयात धोरण रद करावे. कांद्याला चांगला दर मिळावा यासाठी केंद्र व राज्य सरकारने त्वरित प्रयत्न करावे. वाढते भारनियमन रद्द करून शेतीसाठी दिवसा सुरळीत वीजपुरवठा करावा. वरील मागण्यांच्या अनुषंगाने माजी खासदार राजू शेट्टी यांनी २५ नोव्हेंबर रोजी राज्यव्यापी आंदोलनाची हाक दिली असून संघटनेचे जिल्हाध्यक्ष निवृत्ती गारे, निफाड येथेही स्वाभिमानी शेतकरी तालुकाध्यक्ष गजानन घोटेकर, संघटनेच्या वतीने याबाबत शेतकरी संघर्ष समितीचे आंदोलन करण्यात येणार असून जिल्हाध्यक्ष सुधाकर मोगल, संजय त्यापूर्वीच शेतकऱ्यांच्या भावना पाटोळे, पुंजाराम कडलग विचारात घेऊन शासनाने वरील यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी मागण्यांची सोडवणूक करावी, शासनाने मागण्यांची असेही निवेदनात म्हटले आहे.



## दोन कोटी नागरिकांना फ्रेंड्स ऑफ बीजेपीच्या माध्यमातून पक्षाला जोडणार

### भाजपा प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**रत्नागिरी :** भारतीय जनता पार्टी महाराष्ट्रात फ्रेंडस् ऑफ बीजेपी या मोहिमेतून दोन कोटी नागरिकांना जोडणार आहे, असे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी सांगितले. ते रत्नागिरी जिल्ह्याच्या संघटनात्मक दौऱ्यावर होते. त्यावेळी पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, प्रदेश सचिव प्रमोद जठार, भाजपा महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ आणि रत्नागिरी दक्षिण जिल्हाध्यक्ष दीपक पटवर्धन उपस्थित होते. चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, समाजामध्ये असा फार मोठा वर्ग आहे जो पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर प्रेम करतो आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारला पाठिंबा देतो. राष्ट्रभक्तीने भरलेला डॉक्टर, वकील, साहित्यिक अशा प्रबुद्ध नागरिकांच्या वर्गाला भारतीय जनता पार्टीबद्दल आत्मीयता आहे पण तो पक्षाच्या दैनंदिन कार्यक्रमात सहभागी होऊ शकत नाही. अशा नागरिकांना 'फ्रेंडस ऑफ बीजेपी' या अभियानातून पक्षाशी जोडून घेतले जाईल. त्यांनी एका मोबाईल क्रमांकावर मिस्ड कॉल दिला की त्यांना एक लिंक पाठविली जाईल. त्या लिंकवर त्यांनी त्यांची नाव, पत्ता इत्यादी माहिती भरली की त्यांना स्मार्ट कार्ड आणि गाडीवर लावण्याचे स्टीकर पाठवले जाईल. तसेच त्यांना व्हॉटस् अपद्वारे नियमितपणे मोदीजींच्या केंद्र सरकारविषयी, भाजपा आणि बाळासाहेबांची शिवसेना युती सरकारच्या कामाविषयी आणि भाजपाविषयी माहिती देण्यात येईल.

## बोम्मई यांची प्रतिकात्मक तिरडी जाळण्याचा प्रयत्न

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** महाराष्ट्रातील जागेवर कर्नाटक राज्याचा हक्क सांगणारे कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांची प्रतिकात्मक तिरडी जाळण्याच्या प्रयत्नात ठाकरे गटाचे शिवसैनिक आणि पोलिसांमध्ये धक्काबुक्की होण्याचा प्रकार शुक्रवारी घडला. महाराष्ट्रातील जत तालुका तसेच सोलापूर जिल्हा या भूभागावर कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी दावा केल्याने सीमाभागातील मराठी भाषक तसेच कोल्हापूर, सांगली, सोलापूर जिल्ह्यातून संताप व्यक्त केला जात आहे. यावेळी पोलिसांनी शिवसैनिकांच्या खांद्यावरील तिरडी काढून घेण्याचा प्रयत्न केला.



## बच्चन यांची कोर्टात धाव

आधुनिक केसरी

बॉलिवुडमध्ये बिग बी म्हणून ओळखले जाणारे अमिताभ बच्चन हे त्यांच्या शांत आणि संयमी स्वभावासाठी ओळखले जातात. ऑन स्क्रीन अँग्री यंग मॅनची ओळख निर्माण करणारे अमिताभ बच्चन खऱ्या आयुष्यात तितकेच मृदूभाषी असल्याचे त्यांच्या अनेक कार्यक्रमांमधून आणि सामाजिक उपस्थितीमधून ठळकपणे समोर येते. मात्र, आपल्या नावाचा, फोटोंचा किंवा आवाजाचा गैरवापर होत असल्याचे पाहून बिग बी चांगलेच संतप्त झाले आहेत. याविरोधात त्यांनी थेट दिल्ली उच्च न्यायालयात दाद मागितली. न्यायालयानेही त्यांची बाजू ऐकून घेतल्यानंतर यासंदर्भात अंतरिम आदेश देऊन बिग बींना दिलासा दिला आहे. अमिताभ बच्चन यांनी दिल्ली उच्च न्यायालयात पर्सनॅलिटी राईट्स अर्थात व्यक्तिमत्व हक्कांसाठी याचिका दाखल केली होती. ज्येष्ठ वकील हरीष साळवे हे अमिताभ बच्चन यांची बाजू न्यायालयात मांडत आहेत. न्यायमूर्ती नवीन चावला यांच्यासमोर या प्रकरणाची आज सुनावणी झाली. या सुनावणीदरम्यान अमिताभ बच्चन यांनी आपली भूमिका स्पष्टपणे न्यायालयासमोर ठेवल्यानंतर न्यायालयाने त्यांच्या बाजूने अंतरिम आदेश दिले आहेत. अमिताभ बच्चन यांच्या बाजूने हरीश साळवेंनी न्यायालयात केलेल्या युक्तीवादामध्ये यासंदर्भात सविस्तर भूमिका मांडण्यात आली. “मी फक्त थोडी माहिती देतो की नक्की चाललेय काय? कुणीतरी टीशर्ट तयार करते आणि अमिताभ बच्चन यांचे फोटो त्यावर लावते. कुणीतरी अमिताभ बच्चन यांचे पोस्टर विकत असते. कुणीतरी अमिताभ बच्चन डॉट कॉम या नावाने वेबसाईट रजिस्टर करते. यामुळेच आम्ही त्यांच्या पर्सनॅलिटी राईट्ससंदर्भात याचिका दाखल केली आहे, असे हरीश साळवे युक्तीवादामध्ये म्हणाले. अमिताभ बच्चन यांची बाजू ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने त्यांना दिलासा दिला आहे. याचिकाकर्ते हे समाजातील सुप्रसिद्ध व्यक्ती आहेत यात कोणतीही शंका नाही. ते अनेक जाहिरातींमध्येही झळकतात. मात्र, त्यांच्या परवानगीशिवाय त्यांच्या प्रसिद्धीचा वापर करून काही लोक त्यांची उत्पादने विकत असल्याचे पाहून ते व्यथित झाले आहेत. त्यामुळे त्यांच्या परवानगीशिवाय कुठलंही उत्पादन विकण्यासाठी त्यांच्या फोटोचा, आवाजाचा किंवा प्रसद्धीचा कुणी वापर करू शकणार नाही, असे अंतरिम आदेश न्यायमूर्ती नवीन चावला यांनी दिले आहेत. तसेच, यासंदर्भातला कोणताही मजकूर आढळल्यास तो संबंधित ठिकाणाहून हटवण्यात यावा, असे आदेशही न्यायालयाने केंद्रीय माहिती व तंत्रज्ञान विभागाला दिले आहेत.

## भारतीय संविधानाचे तत्वज्ञान आणि वर्तमान

आधुनिक केसरी



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

**भारत देश मोठ्या उत्साहाने स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरे करतो आहे! या संबंधाने राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्थरावर भारताच्या अनेक बाबींचा उहापोह केल्या जात असतांना विशेषत्वाने भारतीय संविधानाचा विचार सर्वच पातळ्यांवर विद्वजन करताहेत ही गौरवपूर्ण बाब आहे! भारताच्या कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळाचा डोल्हारा सक्षमपणे उभा आहे त्या संविधानाकडे आपण सर्वांनीच मोठ्या जबाबदारीने पहायची वेळ आली आहे! आज २६ नोव्हेंबर संविधान दिन साजरा करतांना संपूर्ण देशभर भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रीकेचे वाचन मोठ्या आवाजात केले जाईल ही अत्यंत गरजेची बाब आहे! मात्र आज संविधान दिनाच्या निमित्ताने काही मुलभूत प्रश्नांचा उहापोह व्हावा आणि त्यावर आपण सार्वांनीच सखोल विचार करणे क्रमप्राप्त आहे.**

सज्जनहो, भारतीय संविधान समजून घेण्यापूर्वी आपल्याला संविधानाचे मुलभूत तत्वज्ञान समजून घ्यावे लागेल. संविधानाचा एकएक भाग मूलगामी आणि दूरगामी विचारपूर्वक लिहिला असून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपली संपूर्ण प्रज्ञा, प्रतिभा, वैश्विक तत्वज्ञान याचा अत्यंत विवेक-विचारशील सामर्थ्याने विचार करून जगातील जवळपास ६० राज्यघटनांचा सखोल अभ्यास, चिंतन, मनन करून त्या राज्यघटनेतील जी सारतत्वे अथवा मुल्ये भारतीय सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, भौगोलिक, आर्थिक आणि सैद्धांतिक परिपेक्षात दूरगामी प्रभाव दर्शवतील तिच तत्वे संविधानात समाविष्ट केली आहेत. भारतीय संविधान केवळ एक पुस्तक नाही? तो केवळ एक कागदी दस्ताऐवज नसून भारतीय माणसांच्या मुलभूत-आनंदी जीवन व्यतीत करण्याचा देशधर्म ग्रंथ आहे! कोणत्याही देशाचे संविधान हेच त्या देशाचा आत्मा असते. देशातील तमाम घटकांचा सर्वोच्च उत्कर्षाचे तत्वज्ञान समोर ठेवूनच त्याची निर्मिती होणे अपेक्षित असते आणि भारतीय संविधान त्या अपेक्षेला तंतोतंत उतरले आहे. भारतीय संविधान हे केवळ लोकशाही, अधिकार, कर्तव्ये अंतर्भूत असलेले पुस्तक नसून तात्विक दृष्ट्या इथल्या शेवटच्या घटकाची सर्वांगीण काळजी वाहणारा तो एक मूलगामी तत्वग्रंथ आहे! भारतीय संविधानाचे तत्वज्ञान समजून घेतांना जपानच्या राज्यघटनेची "आम्ही जपानचे लोक, सर्वकाळ शांती आणि आदर्श मानवी संबंध या सद्सद्विवेकाने राज्यघटना स्वीकारत आहोत" ही उद्देशपत्रिका वाचल्यास भारतीय संविधानाची उंची आणि खोली सहजच लक्षात येईल!

संविधान म्हणजे कोणत्याही देशाच्या लोकशाही शासन व्यवस्थेचा आरसा असते. भारतीय संविधानाची उद्देशपत्रिका संविधानाचा आत्मा आहे. भारतीय संविधानाचे तत्वज्ञान अभ्यासतांना शिल्पकारांनी केवळ स्वातंत्र्य हा एकच उद्देश न ठेवता आपल्या देशात 'उदारमतवादी, लोकशाहीवादी, समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता' इत्यादी सर्वोच्च तत्वे समोर ठेवून हे संघराज्य तमाम समुदायासाठी मानवी मुल्ये, धार्मिक आणि भाषिक गरजा, ऐतिहासिक दृष्ट्या वंचित-उपेक्षित घटकांविषयी संवेदनशीलता इत्यादी बाबी महत्वपूर्ण मानून देशाला एक समान राष्ट्रीय ओळख निर्माण व्हावी' हे तत्वज्ञान रुजविण्याचे महत्कार्य केले आहे. देश चालवण्यासाठी संविधान सर्वकाल पंचाच्या भुमिकेत असते. स्वातंत्र्य, समता, सामाजिक न्याय, शांतता आणि राष्ट्रीय एकात्मता या मुलभूत तत्वज्ञानावर आपल्या संविधानाची तात्विक उभारणी झाली आहे याचा मागील ७२ वर्षात देशाला अनुभव आला आहे. भारतीय संविधानाचा सरनामा हा संक्षिप्त राज्यघटनाच आहे. संविधानाचे अंतिम साध्य काय आहे( ?) याची उत्तरे आपल्याला संविधानाच्या सरनाम्यातच मिळतात. सरनामा हा आपल्या संविधानाचा नकाशा असून त्यात भारतीय लोकशाहीच्या चातुर्सिमा दृगोचर होतात. "आम्ही भारतीय लोक" या सर्वनामयुक्त कर्त्याने राज्यघटनेचा प्रारंभ होतो. इथेच भारतीय राज्यघटनेची सर्वसमावेशकता स्पष्ट होते. भारतीय राज्यघटना सर्व भारतीयांना एका रेषेत आणून बसवते. त्यानंतर सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, प्रजासत्ताक" आणि "न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता" हे सर्वच शब्द वाचकांना अंतर्मुख करतात. हे ९ शब्द म्हणजे भारतीय राज्यघटनेचे मुलभूत तत्वज्ञान आहे. सार्वभौमत्व म्हणजेच जगण्याची अंतर्बाह्य मुल्ये अधोरेखित होतात. समाजवादी हा शब्द ४२ व्या घटना दुरुस्तीने समाविष्ट झाला असून याद्वारे संविधान नागरिकांना सामाजिक धोक्यापासून संरक्षण देते. धर्मनिरपेक्षता अत्यंत महत्वपूर्ण तत्व असून 'देश कोणताही धर्म श्रेष्ठ किंवा कनिष्ठ' याचे उदात्तीकरण करत नाही' हे



लक्षात घेणे आवश्यक आहे. भारताने संसदीय लोकशाही स्वीकारली असून स्वतंत्र कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्याय मंडळ याद्वारे देश चालतो आहे. प्रजासत्ताक लोकशाही म्हणजे मतदानाद्वारे लोक आपले प्रतिनिधी संसदेत पाठवून त्यांच्याद्वारे भारतीय संसद संपूर्ण देशाच्या सर्वांगीण विकासासाठी कटीबद्ध आहे. सर्व भारतीयांना समान न्याय असून विचार, अभिव्यक्ती, श्रद्धा, उपासना स्वातंत्र्य हा भारतीय लोकशाहीचा श्वास आहे. त्याचबरोबर दर्जा आणि संधीची समानता आणि 'वसुधैव कुटुम्बकम्' म्हणजेच विश्वबंधुता ही महत्वपूर्ण तत्वे अंतर्भूत असून याद्वारे देशातील कोणत्याही नागरिकाचा जात-धर्म-पंथ-लिंग याद्वारे भेदभाव करणे कायद्याने गुन्हा आहे. हे नऊ शब्द म्हणजेच या नऊ तत्वांवर संपूर्ण राज्यघटनेचे तत्वज्ञान अवलंबून असून संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी २ वर्षे ११ महिने १८ दिवस रात्रीचा दिवस करून, शारीरिक व्याधींचा कसलाही विचार न करता हे संविधान देशाला बहाल केले. भारतीय संविधानाच्या अनुषंगाने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान म्हणजे भारतीय स्वातंत्र्याच्या मोलाएवढेच आहे(!) असे म्हणणे अतिशयोक्ती होणार नाही.

भारतीय संविधानातील वरील मुलभूत नऊ तत्वांचा विचार करता, या संदर्भाने वर्तमानात मोठ्या प्रमाणावर लोकजागृती होणे अत्यावश्यक वाटते. आज आपण जागे होण्याची वेळ येऊन ठेपली आहे. कोणत्याही देशाचे भवितव्य तिथल्या तरुणांच्या हाती असते. तरुणांच्या ओठांवर वाजणाऱ्या गाण्यावरून त्या देशाचे भवितव्य लोकाभिमुख होत असते. तेंव्हा तरुणांनीच या नऊ तत्वांचा प्रचार-प्रसार मोठ्या प्रमाणात करून स्वातंत्र्य-समता-बंधुता-धर्मनिरपेक्षता या मुलभूत लोकशाही तत्वांची जपणूक करणे अत्यावश्यक आहे. कुणीही कोणत्याही बाबतीत म्हणजेच जात-धर्म-पंथ-लिंग बाबतीत कट्टरता प्रदर्शित करू नये. धर्माच्या नावाखाली कट्टरता प्रसारित झाल्यास इतर धर्माच्या लोकांमध्ये असुरक्षिततेची भावना प्रसारित होऊन स्वातंत्र्य-समता-बंधुता याची पायमल्ली होऊ शकते. आज आपण राष्ट्रीय प्रतीके असणाऱ्या महापुरुषांची वाटणी न करता त्यांना त्यांच्या जागी अबाधित ठेवणे गरजेचे आहे. त्याचबरोबर बऱ्याच वेळा भारतीय संविधान बदलणार किंवा अन्य काही संदर्भाने वावड्या उठवल्या जातात, असे सुद्धा होता कामा नये. त्यासाठी भारतीय संसदेमध्ये देशाच्या सन्मानीय पंतप्रधानांनी संसदेत भाषण करतांना वारंवार देशाच्या वरील नऊ तत्वांचा उल्लेख करून त्या संदर्भाने काम करत राहिले पाहिजे. सरकार कोणत्याही पक्षाचे असो ते देशाच्या संसदीय लोकशाहीला जबाबदार असून त्या सरकारने भारतीय संविधानाच्या मुलभूत तत्वज्ञानाचे दरवर्षी संसदेत सार्वजनिक वाचन केले पाहिजे. संसदीय लोकशाहीची देशामध्ये रुजवणूक होतांना राष्ट्रहित-समाजहित समोर ठेवून स्वातंत्र्य-समता-बंधुता याचा मोठ्या प्रमाणात प्रचार-प्रसार होत राहणे अत्यंत गरजेचे आहे. आज सगळीकडे मंदिर-मस्जिद-झेंडे-भोंगे आदी विषय गाजत आहेत. कायदा उल्लंघन होत असेल तर नक्कीच त्यावर निर्बंध यायला हवेत. त्याचबरोबर सरकारने वाढती महागाई, बेरोजगारी संबंधाने मुलभूत धोरणांची अमलबजावणी करून खाजगीकरणाला आळा घातला पाहिजे. मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून तरुणांची डोकी कामाला लावल्यास आपला देश मोठ्या दिमाखात स्वातंत्र्याची शंभरी साजरी करेल यात तिळमात्र शंका नाही! जय संविधान!

## पाण्याचे दुर्भिक्ष दूर करणारी अमृत सरोवर मोहीम

आधुनिक केसरी



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

**संपूर्ण भारत देशात ऐन उन्हाळ्यात सर्वच भागात विशेषतः ग्रामीण भागात पाण्याची भीषण समस्या निर्माण होते आणि पाण्याच्या पातळीत लक्षणीय घट होत असल्याने ग्रामस्थांना पुरेसा पाणी मिळत नाही. पाण्याचा साठा.त्यांना समस्येला सामोरे जावे लागते.ही समस्या लक्षात घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव वर्षात य ड्रीम प्रोजेक्ट अंतर्गत संपूर्ण भारतात सरोवर बांधण्याचा संकल्प केला आहे.हा ड्रिम प्रोजेक्ट जनसहभागातून पूर्ण केला जात आहे.या मोहिमेच्या प्रारंभापासून देशात २५हजारांहून अधिक सरोवराचे बांधकाम पूर्ण झाले आहे. जनसहभाग हा अमृत सरोवर मोहिमेच्या केंद्रस्थानी आहे.यात सर्व स्तरातील लोकांचा सहभाग आहे.**

मोहिमेच्या प्रारंभापासून स्वातंत्र्य सैनिक,आणि त्यांचे कुटुंबीय, पद्म पुरस्कार विजेते किवां स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ज्येष्ठ व्यक्ती अशांनकडून करण्यात आली आहे.या योजेअंतर्गत वृक्ष लागवड देखील करण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत संपूर्ण भारतातील प्रत्येक जिल्ह्यात ७५ तलाव बांधण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, जेणेकरून या जिल्ह्यांतील पाण्याची समस्या दूर होऊन पाण्याची पातळी वाढवता येईल. या नव्याने निर्माण झालेल्या पाण्याचा उपयोग शेती, पशुपालन आदी समस्या सोडवण्यासाठी केला जाणार आहे. भारतातील पाण्याची समस्या सोडवण्यात ही योजना बऱ्याच अंशी यशस्वी होईल. अमृत सरोवर योजनेंतर्गत, उत्तराखंडच्या कलसी ब्लॉक अंतर्गत गाव पंचायत बजाऊ येथे एक तलाव देखील बांधण्यात आला, ज्याची क्षमता सुमारे ९ लाख लिटर आहे. या योजनेमुळे उन्हाळ्यात भूजल पातळी राखण्यास मदत होईल. या ड्रीम प्रोजेक्ट अंतर्गत उत्तर प्रदेशमध्ये १५४१५ अमृत सरोवर विकसित करण्यासाठी निवडण्यात आले होते. त्यापैकी ८३४३ तलावांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. सर्व अमृत सरोवरांजवळ लोकोपयोगी कामेही केली जात आहेत.
याद्वारे प्रत्येक राज्याला सरोवर योजनेद्वारे अनेक प्रकारचे फायदे मिळतील. अमृतसर आणि योजनेंतर्गत भारतातील प्रत्येक राज्यात प्रत्येक जिल्ह्यात ७५-७५ तलाव बांधले जातील, त्यांचे नूतनीकरण केले जाईल.तलावाच्या बांधकामासह त्या ठिकाणी सुशोभीकरण व पर्यटनाला चालना मिळणार आहे. उन्हाळ्यात भूजल पातळी राखण्यास मदत होईल.यामुळे शेतकऱ्याला सिंचनासाठी पुरेशा पाण्याची व्यवस्था नेहमीच उपलब्ध होणार आहे. अमृतसरमध्ये आणि योजनेअंतर्गत उन्हाळ्यात तलावातील जलचर प्राणी आणि पक्ष्यांना पाण्याची समस्या भासणार नाही. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था मजबूत होईल. मत्स्यशेती व सिंचन व्यवस्थेसाठी शेतकऱ्यांना भरपूर फायदा मिळू शकेल.गुलाब योजनेच्या माध्यमातून अमृत सरोवर योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील रहिवाशांना मनरेगा योजनेंतर्गत समजून घेऊन रोजगार उपलब्ध करून दिला जाणार आहे. जेणेकरून बेरोजगारीचा प्रश्नही बऱ्याच अंशी सुटणार आहे. सर्व प्राणी, प्राणी, पक्षी, झाडे, वनस्पती आणि सर्वांच्या जीवनासाठी पाणी अत्यंत महत्त्वाचे आहे. मानव इत्यादि पृथ्वीवर अस्तित्वात आहेत, हा महत्त्वाचा घटक आहे. पाण्याशिवाय आपले जीवन काही नाही. प्राकृत अतिशय दयाळू आणि दयाळू आहे, त्याने आपल्याला पावसाच्या रूपात, नदीच्या रूपात, तलावाच्या रूपात, झरे आणि समुद्र इत्यादीच्या रूपात पाणी दिले आहे. या सर्व स्रोतांतून मिळणारे पाणी जपून ते सुरक्षित ठेवल्यास पाण्याच्या समस्येतून कायमची सुटका होऊ शकते. खड्डे आणि तलावात साठवून ठेवल्यास पावसातून दरवर्षी करोडो लिटर पाणी मिळते . जर आपण ते तयार करून संकलित केले तर पाण्याच्या भीषण समस्येपासून आपण बऱ्याच अंशी सुटका करू शकतो. अमृत सरोवर आपल्यासाठी खूप उपयुक्त आहे, भूगर्भातील पाणी वाढवण्याबरोबरच आपण पिण्यासाठी, पशु-पक्षी, सिंचन इत्यादी पाण्याची व्यवस्था नैसर्गिकरित्या करतो. आपल्या देशातील काही भागात अजूनही टाक्याद्वारे सिंचन केले जाते. तलावामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी वाढण्याबरोबरच आजूबाजूच्या दुर्गम भागातील भूगर्भातील पाण्याची पातळीही वाढते, त्यामुळे पाण्याची समस्या दूर होते.
महाराष्ट्र शासनाने पुढील तीन वर्षासाठी राज्यातील चारही कृषी विद्यापीठांना प्रत्येकी ५० कोटी असे एकूण ६०० कोटी रुपये देण्याचे नियोजन केले असून या माध्यमातून संशोधनाला चालना मिळणार आहे. राज्याचा जमिनीचा पोत, पीक, वाण, उत्पादकता, प्रक्रिया यांचा समावेश असलेला विभाग निहाय कृषी आराखडा तयार करण्यात येत आहे. मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यात ७५ अमृत सरोवरांची निर्मिती होणार आहे. त्यासाठी सखल भाग, पावसाच्या पाण्याचा मार्ग यासह इतर बाबी तपासूनच जागेची निवड होणार आहे. एक एकर क्षेत्रात होणाऱ्या एका अमृत सरोवरामध्ये १०हजार क्युबिक मीटर पाणी साठवण क्षमता असणार आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# जगाला पर्यावरण संरक्षणाची नितांत गरज



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**जग विनाशाकडे वाटचाल करीत आहे.याकरीता जगाने पर्यावरण वाचविण्यासाठी संपूर्ण ताकदीनीशी पर्यावरणाचे संतुलन ठेवुन संरक्षण करण्याची गरज आहे. वाढते प्रदुषण रोखण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न व्हायला हवेत.पर्यावरणाची सुरक्षा व संरक्षण करण्यासाठी संयुक्त राष्ट्रानी पर्यावरणाच्या प्रती वैश्विकस्तरावर आणि राजनीतीक व सामाजिक जागृती आणण्याकरिता संयुक्त राष्ट्राने 26 नोव्हेंबर 1992 ला "विश्र्व पर्यावरण संरक्षण दीवस" साजरा करण्याची सुरुवात केली. त्यामुळे संपूर्ण जगात 26 नोव्हेंबर विश्र्व पर्यावरण संरक्षण दिवस म्हणुन साजरा करण्यात येतो. आज संपूर्ण जग सुरक्षीत रहावे असे सर्वांना वाटते.परंतु जगातील मानवांच्या अतीरेकामुळे मोठ्या प्रमाणात जंगलतोड,खणन,नदितील रेती खणन त्याचप्रमाणे सोने, चांदी,हिरे व खनिज संपत्ती इत्यादीवर मानवाने सरळ घणाघाती प्रहार करून निसर्गाच्या मुळावरच मानवाने कुह्राड मारल्याचे दिसून येते यामुळे निसर्गाचे संतुलन डगमगतांना दिसत आहे.**

पर्यावरणाची ढासळती परीस्थिती पहाता पृथ्वीतलावरील संपूर्ण मानवजाती व जीव-जंतु भयभित झाल्याचे दिसून येते. त्यामुळे आज जगाला पर्यावरणाचे संरक्षण कसे करता येईल याकडे सर्वांनीच लक्ष केंद्रित केले पाहिजे. भारतात जंगल, पशु-पक्षी व प्राणी यांना सरकारकडुन संरक्षण मिळावे यासाठी 26 मार्च 1974 ला गढवाल मधील हेनवलघाटी येथे गौरादेवी यांच्या नेतृत्वाखाली"चिपको आंदोलनास सुरूवात झाली व पर्यावरण संरक्षणाची मिसाल जागृत केली.आज तसे पाहिले तर स्थल, जल, वायु मोठ्या प्रमाणात प्रदुषित झाल्याचे दिसून येते.मानवाने जर पर्यावरणाला वाचविले तर जलप्रदूषण, वायुप्रदूषण यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरपूर मदत मिळु शकते. आज पर्यावरणात इतके प्रदुषण दीसुन येते की पक्षांचे जगणे कठीण झाले आहे. आज भारतातच नाही तर संपूर्ण जगात जंगल तोड मोठ्या प्रमाणात होत आहे.याचाच परीनाम पर्यावनावर मोठ्या प्रमाणात होतांना दिसते.भारतासह जगातील वाढती लोकसंख्या हीच पर्यावरण नियंत्रण ठेवण्यास मोठी अडचण असल्याचे मी समजतो.मानवाने आपल्या सुख-सुविधांसाठी पर्यावरणाकडे पुर्णतः दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.आज पर्यावरणावर अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की "जगावं की मरावं" कारण आज पर्यावरणाचा आधारस्तंभ "वृक्ष"आहे व त्याला साथ हवी जल व वायूची परंतु हे संपूर्ण दुषीत झाल्यामुळे पर्यावरण धोकादायक स्थितीत पोहोचले आहे. असेही सांगण्यात येते की पर्यावरणाच्या ढासळत्या परिस्थितीमुळे जगातील 10 लाख प्राणी व वनस्पती नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. ज्या पक्ष्यांवर पर्यावरणाची धुरा आहे ते गिधाड पक्षी सुध्दा संपुष्टात येत आहे.मानवाने निसर्गावर एवढा अत्याचार केला की वृक्ष कटाईच केली नाही तर वृक्षांना जळामुळा सकट त्याला उपडुन फेकले.यामुळेच आज पर्यावरण मानवापासुन भयभीत आहे. आज औषधोपयोगी वनस्पती पर्यावरणाच्या ढासळत्या परीस्थितीमुळे नस्तनाबुत होत आहे.त्याचप्रमाणे अनेक औषधोपयोगी वनस्पती लुप्त झाल्या आहेत.जगातील वाढत्या प्रदूषणामुळे 30 टक्के वृक्षप्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत आणि विविध देशांतील 142 प्रजाती याआधीच पृथ्वीतलावरून लुप्त झाल्या आहेत ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.भारतात वृक्षांच्या 2603 प्रजाती आहेत यातील 469 प्रजाती धोकादायक स्थितीत आहेत म्हणजेच भारतातही गंभीर समस्या आहे.आज पर्यावरणाचे संतुलन विस्कळीत झाल्यामुळे जंगलातील संपूर्ण प्राणी शहरात, गावात प्रवेश करतांना दिसतात.यात हिंसक प्राणी शहरात व गावात प्रवेश करून मानव हानी व पाळीव प्राण्यांची हानी मोठ्या प्रमाणात होतांना दिसते.यामुळे जंगली प्राणी व मानव यांच्यात मोठ्या प्रमाणात शत्रृत्व दिसून येते.कारण जंगल संपदा नष्ट होत आहे यामुळे जंगलात रहाणारे पशु-पक्षी यांचे खान-पान ऐका-मेकांवर अवलंबून असते.परंतु जंगल तोडीमुळे अनेक प्राण्यांच्या व पक्षांच्या प्रजाती लुप्त होतांना दिसते किंवा त्यांची शिकार होतांना दिसते किंवा पर्यावणाच्या ढासळत्या परीस्थितीमुळे मृत्यूशी झुंज देतांना अनेक पशु-पक्षी दीसतात.त्यामुळे आज पर्यावरणाचे संरक्षण करण्याची प्रथम जबाबदारी मानवजातीची आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. आज प्लास्टीकनेसुध्दा पर्यावरणाला प्रदुषीत केल्याचे दिसून येते.मानवाने स्वतःच्या स्वर्थासाठी पर्यावरणाचे जनुकाय संपूर्ण रक्त पीवुन निचोडुन ठेवल्याचे दीसुन येते.आज जगात विश्र्व शांतीसाठी पर्यावण वाचवीण्याची गरज आहे.आज मानवजातींमध्ये वाढणाऱ्या बिमाऱ्या, अनेक व्याधी ह्या सर्व पर्यावरणाच्या बिघडत्या संतुलनामुळे दिसून येतात. यामुळे आज मानवाचे आयुष्यमान दिवसेंदिवस कमी होतांना दिसून येते.पशुपक्षांचेतर जगने अत्यंत कठीण झाले आहे.जगात वाढते कारखाने आणि जगातील युध्दसामुग्रीची शर्यत व अनेक परमानु परिक्षण यामुळे संपूर्ण जग प्रदुषीत होतांना दिसते.आज भारतातील जिवंत उदाहरण म्हणजे "भारताची राजधानी दिल्ली" प्रदुषणाच्या बाबतीत जगात प्रथम क्रमांकावर असल्याचे सांगितले जाते.याचाच अर्थ असा की दील्ली आज प्रदुषणाच्याबाबतीत महाभयानक परीस्थिती असल्याचे दिसून येते.आज प्रदुषणामुळे दिल्ली गॅसचेंबर बनले की काय असे वाटत आहे.या महाभयानक परीस्थितीत दील्लीवासी "मास्क"चा मोठ्या प्रमाणात वापर करतांना दिसतात.यामुळे असे वाटते की "दील्लीमध्ये मास्क युग आले की काय असे वाटत आहे". संयुक्त राष्ट्राने 1992 ला पर्यावरण संरक्षण करण्याची संकल्पना जाहीर केली होती.परंतु याबद्दल कीती देश अलर्ट व सजन आहे हे पहाने गरजेचे आहे.



पर्यावरण संरक्षण करण्याची घोषणा करणे वेगळे आहे.परंतु त्याला कृतित कोणता देश रूपांतरित करतो त्याला जास्त महत्त्व आहे. कारण आज संपूर्ण जग बारूदच्या ढीगाऱ्यावर बसलेले आहे. याचे उदाहरण म्हणजे अझरबैजान-आर्मेनिया युद्ध आणि आता गेल्या 9 महिन्यांपासून सुरू असलेले रशिया-युक्रेन युद्ध.त्यामुळे मानवजातीने आपल्या मृत्यूचीही व्यवस्था केल्याचे दिसून येते. मानवजातीने आता पर्यावरण वाचवीले नाही तर पृथ्वीचा विनाश अटळ आहे.याकरीता जगातील संपूर्ण देशांनी विश्र्व पर्यावरण संरक्षण दीवसाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवडीचा कार्यक्रम राबविला पाहिजे.आज पर्यावरण संरक्षणा करीता लोकसंख्येवर नियंत्रण असने गरजेचे आहे, वाढते शहरीकरण थांबवीले पाहिजे, कारखान्यांतील धुळ व दुषीत पाणी यांचा बंदोबस्त केला पाहिजे,भारतासह जगात अनेक वाहन दुषीत धुर ओकत असतात ते कुठेतरी थांबवीले पाहिजे.आज पर्यावरण विस्कळीत झाल्यामुळे व प्रदुषणामुळे मानवजातीच्या आरोग्यावर संकट ओढावले आहे यात कॅन्सर,टीबी, मधुमेह,हार्ड अटॅक इत्यादी सह अनेक बिमाऱ्या मोठ्या प्रमाणात दीसुन येतात.आज भारत मोठ्या प्रमाणात प्रगतीपथावर आहे.परंतु पर्यावरणाच्या बाबतीत मागे असल्याचे दिसून येते.याचे जीवंत उदाहरण म्हणजे"दील्लीतील प्रदुषण". त्यामुळे भारताने मुख्यत्वे करून पर्यावरण संरक्षणासाठी युध्दपातळीवर कार्य करण्याची गरज आहे. गेल्या 5 ते 10 वर्षांपासून जगात अनेक महाप्रलय, मोठ्या प्रमाणात सुनामी,ग्लेशीअर वितळने,अती पाऊस,अती उष्णता,अती थंडी,मोठ-मोठे जंगल संपदा जळुन खाक होने ह्या संपूर्ण घटना निसर्गाचे संतुलन डगमगल्याने व पर्यावरणाची हत्या केल्याने ह्या घटना घडल्याचे स्पष्ट दीसुन येते.त्यामुळे आज पर्यावरणाला वाचविण्याकरिता जगातील संपूर्ण देशांनी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवडीकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे.भारतात शहरांचे सौंदर्यकरन करण्याच्या उद्देशाने जंगल तोड करने बरोबर नाही. त्यामुळे भारत सरकारने जंगल तोड ताबडतोब थांबवली पाहिजे. यामुळे पर्यावण शुद्ध राहिल.पर्यावरन संरक्षण दीनाच्या निमित्ताने मी सरकारला एकच आव्हान करतो की जंगल तोड ताबडतोब थांबवली पाहिजे व ओसाड जागेवर मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करायला पाहिजे.त्याचप्रमाणे जनतेला मी एकच आव्हा करतो की 26 नोव्हेंबर पर्यावरण संरक्षण दीवसाचे औचित्य साधून या दीवशी प्रत्येकाने आपल्या घरासमोर एकतरी झाड लावावे जागा नसेल तर एखाद्या कुंडीत झाड लावावे व पर्यावरणाचे संरक्षण करावे. त्याचप्रमाणे सरकारने "घर तीथे झाड" ही मोहीम राबविली पाहिजे. वृक्ष लागवडीमुळे "गुरांना चारा,पक्षांना आणि मानवाला फळ व सर्वांना सावली आणि ऑक्सिजन मिळेल"यांच्या संगमाने शुध्द हवा मिळुन पर्यावरणात आल्हाददायक वातावरण निर्माण होईल. पर्यावरण सुरक्षीत तर पृथ्वी सुरक्षीत,पृथ्वी सुरक्षीत मानव, पशु-पक्षी सुरक्षीत हेच धेय्य पुढे ठेवून पर्यावरणाचे संरक्षण केले पाहिजे. आजच्या अत्याधुनिक युगात "मोबाईल टॉवर" मोठ्या प्रमाणात दीसुन येते यामुळेसुध्दा पर्यावरणावर विपरीत परिणाम होतांना दिसतो.यावरसुध्दा नियंत्रण आणन्याची गरज आहे. साडे तिनशे वर्षांपूर्वी संत तुकाराम महाराजांनी निसर्गाचे, पर्यावरणाचे आणि झाडांचे महत्व आपल्या अभंगातून सांगितले होते आणि त्याचे आज अनुकरण होण्याची गरज आहे.वृक्ष वल्ली आम्हा सोयरी वनचरे ! पक्षी सुस्वरे ! आळविता !! येणे सुख रूचे एकांताचा वास ! नाही गुणदोष ! अंगीयेता !!

# मरावे परी देहरुपी उरावे..!



मनोज सानप
संपर्क क्र. 9503546004

आधुनिक केसरी

**अवयवदान म्हणजे काय? जिवंतपणी अथवा मृत झाल्यानंतर आपले अवयव दुसऱ्या व्यक्तीला देणे म्हणजे अवयवदान होय. अवयवदान श्रेष्ठदान असून ज्याद्वारे आपण मृत्यूनंतर आपले अवयवदान करून अंतिम स्वरूपी ज्यांचे अवयव निकामी झाले आहेत, अशा अनेक रुग्णांचे प्राण वाचवू शकतो. ज्या रुग्णांचे अवयव कायमस्वरूपी निकामी झाले आहेत, अशा अनेक रुग्णांसाठी अवयवदान हाच एक आशेचा किरण आहे.**

आधुनिक केसरी

अवयवदान प्रत्यारोपण प्रतिरूप म्हणजे काय?
मानवी अवयव प्रत्यारोपण म्हणजे आधुनिक वैद्यकीय शास्त्राची एक मोठी उपलब्धी आहे. या उपचारात एखाद्या जिवंत वा मृत व्यक्तीचा अवयव अथवा अवयवाचा काही भाग शस्त्रक्रियेद्वारे विलग करून तो एखाद्या गरजवंत रुग्णांमध्ये प्रत्यारोपित करतात. ज्यांचा एखादा अवयव कायमस्वरूपी निकामी झाला आहे, अशा रुग्णांसाठी ही प्रमाणित व उपलब्ध अशी उपचार पद्धती आहे.

**कोणत्या अवयवांचे दान करू शकतो?**

मेंदू स्तंभ मृत्यू (BRAIN DEATH): मृत व्यक्तीची हृदयक्रिया चालू आहे पण तिचा मृत्यू झाला आहे, अशी व्यक्ती बहुतेक प्रमुख अवयवांचे म्हणजे मूत्रपिंड, यकृत, स्वादुपिंड, हृदय, आतडी, डोळे, त्वचा, हृदयाची झडप आणि कानाचे डम यांचेदेखील दान करू शकते. **सामान्य मृत्यू:** मृत व्यक्तीची जिची हृदयक्रिया बंद पडली आहे, अशी व्यक्ती फक्त डोळे व त्वचा या अवयवांचे दान करू शकते. **जिवंत व्यक्ती :** जिवंत व्यक्ती फक्त आपल्या जवळच्या नातेवाईकांसाठीच अवयवदान करू शकते. रुग्ण दात्याचे जवळचे नातेवाईक म्हणजे आजी, आजोबा, नातू, मुलगी, मुलगा, आई-वडील, भाऊ-बहीण अथवा पती किंवा पत्नी हे असावे लागतात. या व्यतिरिक्त कोणालाही रुग्णासाठी अवयवदान करायचे असल्यास शासनाची परवानगी घ्यावी लागते. शासन रुग्ण व दाता यामध्ये काही आर्थिक देवाण-घेवाण नसून फक्त प्रेम व स्नेह या नात्यानेच अवयवदान होत आहे, याची खात्री झाल्यावरच परवानगी देते. जिवंत व्यक्ती फक्त काही मर्यादित अवयवांचे म्हणजे मूत्रपिंड अथवा यकृताचा काही भाग दान करू शकतो.

**मस्तिष्क मृत्यू म्हणजे काय?**

वैद्यकीय शास्त्रानुसार एखाद्या व्यक्तीची चेतना व श्वासोच्छवास कायमस्वरूपी बंद झाल्यास त्याला मृत घोषित करता येते. या दोन्हीचे केंद्र आपल्या मेंदूतील मस्तिष्क स्तंभ या भागात असतो. अपघातात डोक्याला मार लागल्यास मेंदूत रक्तस्राव झाल्याने अथवा मेंदूच्या शस्त्रक्रियेनंतर मस्तिष्क स्तंभास कायमस्वरूपी इजा झाल्यास या व्यक्तीचा मस्तिष्क स्तंभ मृत्यू होऊ शकतो. एखाद्या व्यक्तीचे अतिदक्षता विभागात उपकरणांच्या सहाय्याने हृदय कृत्रिमरित्या क्रियाशील ठेवले असेल तसेच काही ठराविक प्रमाणात चाचण्यांच्या आधारे तिचा मस्तिष्क स्तंभ मृत झाल्याचे निश्चित झाले तर त्या व्यक्तीस मृत घोषित करता येते.

अशा व्यक्तीचे हृदय जास्तीत जास्त 16 ते 72 तासापर्यंत कृत्रिमरित्या क्रियाशील ठेवता येते व याच कालावधीत प्रमुख अंतर्गत अवयवांचे दान होऊ शकते. यासाठी त्या रुग्णाच्या जवळच्या नातेवाईकांची संमती आवश्यक असते.

असे अवयवदान फक्त शासनाने प्रतिरोपणासाठी मान्यता दिलेल्या रुग्णालयातील अतिदक्षता विभागात मस्तिष्क स्तंभ मृत्यू झाल्यासच असू शकतो. मस्तिष्क स्तंभ मृत्त अथवा ब्रेन डेड व्यक्ती जगण्याची काही शक्यता असते का? नाही. एखाद्या व्यक्तीस मस्तिष्क स्तंभ मृत्यू अथवा ब्रेन डेड घोषित केले असेल तर ती व्यक्ती जगण्याची शक्यता अजिबात नसते व ती व्यक्ती मृत असते.

मस्तिष्क स्तंभ मृत व्यक्ती व कोमातील रुग्ण यामध्ये फरक आहे. कोमातील रुग्ण मृत नसतात व ते परत जगण्याची शक्यता असते. तसेच मस्तिष्क स्तंभ मृत घोषित करणे म्हणजे इच्छामरण असे बिलकुल नाही. मस्तिष्क स्तंभ मृत व्यक्ती ही मृत असते.

अवयवदान करायचे असल्यास मृत्यू हा रुग्णालयात येणे गरजेचे आहे का? होय. मस्तिष्क स्तंभ मृत्यू हा प्रतिरोपणासाठी मान्यता असलेल्या रुग्णालयातच घोषित करता येत असल्याने अशा रूग्णालयातील अतिदक्षता विभागातच मृत्यू झाल्यास अवयवांचे दान होऊ शकते. परंतु डोळे व त्वचा यांचे दान मृत्यूनंतर सहा तासापर्यंत घरी मृत्यू झाला असेल तरी होऊ शकते. मस्तिष्क स्तंभ मृत्यू घोषित करणे व अवयवदान कायदेशीर आहे का? होय. भारतामध्ये मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा 1994 नुसार नुसार मस्तिष्क स्तंभ मृत्यू व अवयवदान या दोन्हींना मान्यता दिली आहे. या कायद्याची खालील विशेष उद्दिष्टे आहेत- मस्तिष्क स्तंभ मृत्यूला मान्यता देणे जेणेकरून मृत्यूनंतर अवयवदान होऊ शकेल. रुग्णांच्या उपचारासाठी मृत व्यक्तीचे अवयव काढणे, साठविणे व प्रतिरोपण करणे, यावर नियंत्रण ठेवणे. मानवी अवयवांच्या व्यापारावर प्रतिबंध घालणे, कायद्याने अवयव विकणे व विकत घेणे व त्यासाठी जाहिरात करणे किंवा अवयव मिळवून देण्यासाठी व्यापारी तत्त्वावर मध्यस्थी करणे, यावर बंदी घालण्यात आलेली आहे. अवयवदानानंतर मस्तिष्क स्तंभ मृत व्यक्तीचे शरीर त्यांच्या नातेवाईकांना परत दिले जाते का? होय. मस्तिष्क स्तंभ मृत व्यक्तीचे अवयव काढल्यानंतर त्यांचे शरीर सन्मानपूर्वक त्यांच्या नातेवाईकांना अंत्यविधीसाठी परत दिले जाते. अवयवदान व देहदान या दोन्हीमध्ये फरक आहे. देहदानामध्ये मृताचे शरीर वैद्यकीय प्रशिक्षणासाठी वैद्यकीय महाविद्यालयामध्ये ठेवून घेतले जाते तर अवयवदानमधील अवयव प्रत्यारोपणासाठी वापरले जातात व शरीर नातेवाईकांना परत केले जाते. दान केलेल्या अवयवांचे वितरण कसे होते, ते फक्त श्रीमंत व्यक्तींनाच दिले जातात का? नाही. गरजू रूग्णांचे वय, रक्तगट त्यांच्या आजाराची तीव्रता, ते किती दिवस अवयवांची प्रतिक्षा करीत आहेत, त्यांची वैद्यकीय गरज या सर्वांसाठी प्रत्येक रुग्णास गुण दिले जातात. या सर्व गरजू रूग्णांची एक सामायिक प्रतिक्षा यादी केली जाते व सर्वाधिक गरजू रुग्णास अवयव दिला जातो. रुग्णांची आर्थिक स्थिती, त्यांची जात व धर्म, याची प्रतिक्षा यादीत त्यांचे स्थान ठरविताना काही संबंध नसतो. अवयवांचे वितरण हे महाराष्ट्र शासनाने घालून दिलेल्या नियमानुसार विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वय समिती यांच्यामार्फत पारदर्शकपणे होते. मस्तिष्क स्तंभ मृत दात्याच्या नातेवाईकांना अवयव कोणाला दिले आहेत हे कळू शकते का? नाही. नातेवाईकांना अवयव मिळालेल्या रुग्णाचे नाव व पत्ता सांगितला जात नाही. अवयवदान केल्याने मस्तिष्क स्तंभ मृत दात्याच्या शरीरावर काही विद्रूपता येते का? नाही.

मस्तिष्क स्तंभ मृत्यू दात्यास ऑपरेशन थिएटरमध्ये नेऊन त्याचे अवयव काळजीपूर्वक काढले जातात व शरीरावर विद्रूपता येत नाही. एखाद्या व्यक्तीची शस्त्रक्रिया जितक्या काळजीपूर्वकरित्या केली जाते, तितक्याच काळजीपूर्वकरित्या मस्तिष्क स्तंभ मृत्यू दात्याचे अवयव काढले जातात, जखम पुन्हा शिवली जाते. शरीरावर, पोटावर अथवा छातीवर शस्त्रक्रिया केल्याचे टाके मात्र राहतात. अवयवदानाला धर्माची परवानगी आहे का? होय.

भारतातील सर्व धर्मांनी अवयवदानाला पाठिंबा दिला आहे व अवयवदान हे एक पुण्याचे काम मानले आहे. अवयवदान केल्यानंतर मस्तिष्क स्तंभ मृत व्यक्तीच्या नातेवाईकाला काही मोबदला दिला जातो का? नाही. अवयवदानासाठी मस्तिष्क स्तंभ मृत व्यक्तीच्या नातेवाईकाला आर्थिक अथवा कुठल्याही स्वरुपाचा मोबदला दिला जात नाही. म्हणून अवयवदान हे शुद्ध व श्रेष्ठ ठरते. परंतु अवयवदानाला संमती दिल्यानंतर अवयवदानासाठी करण्यात येणाऱ्या चाचण्यांचा तसेच इतर काही वैद्यकीय खर्च मृतांच्या नातेवाईकांना करावा लागत नाही.

**अवयवदान करायची इच्छा असल्यास काय करावे?**

एखाद्या व्यक्तीस मृत्यूनंतर आपल्या अवयवांचे दान करण्याची इच्छा असल्यास त्यांनी कायद्यानुसार संमतीपत्र भरणे आवश्यक आहे. संमतीपत्रावर एखाद्या जवळच्या सज्ञान नातेवाईकांची सही घेणे देखील आवश्यक आहे. असा फॉर्म भरल्यानंतर त्या व्यक्तीस डोनर कार्ड दिले जाईल. हे कार्ड दात्याने सतत आपल्याजवळ बाळगावे. जेणेकरून त्यांच्या नातेवाईकांना अथवा मित्रपरिवाराला त्याच्या अवयवदान करण्याच्या इच्छेविषयी माहिती होईल.

जरी आपण डोनर कार्डवर सही केली असली तरी आपल्या मृत्यूनंतर आपल्या जवळच्या नातेवाईकांच्या संमतीशिवाय अवयवदान होवू शकत नाही, म्हणून आपल्या

अवयवदानाच्या इच्छेविषयी नातेवाईकांना माहिती असणे आवश्यक आहे. अवयवदानाविषयीची अधिक विस्तृत माहिती WWW.DMER.ORG, WWW.NOTTO.NIC.IN या वेबसाईटवर उपलब्ध आहेच. त्याशिवाय डोनर कार्ड व अवयवदानासंबंधी माहिती देण्यासाठी विभागीय स्तरावर मुंबई येथे विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वयन समिती, एल.टी. एम.जी. हॉस्पिटल (सायन हॉस्पिटल) कॉलेज बिल्डिंग, दुसरा मजला, औषध भांडाराच्या बाजूला, सायन (पश्चिम) मुंबई-22, (WWW.ZTCCMUMBAI.ORG), विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वयन समिती, पुणे द्वारा के.ई.एम. हॉस्पिटल, रास्ता पेठ, पुणे-1, (WWW.ZTCCPUNE.ORG), विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वयन समिती, औरंगाबाद, नॅफ्रॉलॉजी विभाग, एम.जी.एम.मेडिकल कॉलेज, एन-6, सिडको, औरंगाबाद 431003, विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वयन समिती,नागपूर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, मानेवाडा, नागपूर-440003 येथे विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वय समिती कार्यरत आहेत.

नांदेड जिल्ह्यातील ज्येष्ठ पत्रकार माधव संताजी अटकोरे (मो.8087565172) यांनी या विषयावर "अवयवदानः पार्थिवाचे देणे" या पुस्तकातून अनेक मान्यवरांचे अनुभव आणि कर्तृत्व अतिशय समर्पक शब्दात गुंफले आहे. या लेखाद्वारे आपल्याला "अवयवदान" या विषयाबाबत आवश्यक ती माहिती मिळाली असेलच, तर मग चला अवयवदानाचा संकल्प करु या.. अन् मरणानंतरही आपले जीवन सार्थकी लावू या..! कविवर्य मंगेश पाडगांवकर यांनी रचलेल्या कवितेतील पुढील ओळी जीवनाचा अर्थ सांगणारी स्त्रोत ठरली आहे!

***आयुष्य हे विधात्याच्या वहीतलं पान असतं***
***रिकामं तर रिकामं, लिहिलं तर छान असतं***
***शेवटचं पान मृत्यू अन् पहिलं पान जन्म असतं***
***मधली पान आपणचं भरायची असतात***
***तेच आपलं कर्म असतं!***

**(लेखक रायगड-अलिबागचे जिल्हा माहिती अधिकारी आहेत)**

# भारतीय संविधान : डॉ. बाबासाहेबांनी लिहिलेला सर्वात सुंदर ग्रंथ



प्रा. प्रवीण डिगांबर बोंद्रे
संपर्क क्र.: 7620021396

आधुनिक केसरी


**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे लोकोत्तर पुरुष होते. त्यांनी समाजातील उपेक्षितांसाठी केलेले कार्य हे अजोड स्वरूपाचे आहे. ते प्रकांड पंडित होते. त्यांचे विविध विषयांवर प्रभुत्व होते. समाजकारण, अर्थकारण, राजकारण, कृषी, कामगार, धर्म, संस्कृती या विषयांवरील त्यांचा व्यासंग दांडगा होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या देशाला सर्वात मौल्यवान देणगी दिली, ती म्हणजे आपली राज्यघटना होय. त्यांना यथार्थरित्या 'घटनेचे शिल्पकार' असे संबोधले जाते.**

अतिशय सखोल अभ्यास आणि अखंड परिश्रम घेऊन बाबासाहेबांनी भारताची घटना लिहिली. या घटनेच्या मजबूत पायावर अतिशय प्रगल्भ अशी लोकशाही भारतात स्थापित झाली आणि वर्षागणित या लोकशाहीची पाळेमुळे देशाच्या भूमीत खोलवर रुजली. घटनेने देशातील सर्वांना समान न्याय, अधिकार, हक्क, प्रगती व विकासाच्या संधी दिल्या. बाबासाहेबांनी देशासाठी सर्वश्रेष्ठ संविधान तयार केल्याने या संविधानाचे निर्माते म्हणून असणारी त्यांची ओळख सर्वत्र रुढ झाली आहे. आपल्या संविधानामध्ये आर्थिक बाबी संदर्भात केलेल्या घटनात्मक तरतुदी अतिशय महत्त्वपूर्ण आहेत. संविधानामध्ये प्रत्येक राज्याला अधिकाराप्रमाणे काही जबाबदाऱ्याही दिल्या आहेत. राज्यघटनेमध्ये आज आपण 100 पेक्षा अधिक सुधारणा केल्या असतील, पण राज्यघटनेची मूळ तत्वे एवढी मजबूत आहेत की, आपल्या समोरील कोणत्याही प्रश्नाचे उत्तर त्यामधून मिळू शकते. भारतीय लोकशाहीचे प्राणपणाने रक्षण करण्याचे कार्य या संविधानाच्या माध्यमातून झाले आहे.

आपले भारतीय संविधान 2 वर्ष, 11 महिने, 18 दिवस येवढ्या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहून पुर्ण केले. हे संविधान 26 नोव्हेंबर 1949 ला भारताने स्विकारले. 26 जानेवारी 1950 ला संविधान अस्तित्वात येऊन त्याची अंमलबजावणी झाली. भारतीय संविधान हा भारताचा सर्वोच्च कायदा आहे. हा दस्तऐवज मूलभूत, राजकीय, संहिता, संरचना, कार्यपद्धती, अधिकार, आणि सरकारी संस्थांचे कर्तव्य, आणि मूलभूत अधिकार , मार्गदर्शक तत्वे आणि नागरिकांची कर्तव्ये निर्धारित करणारी चौकट मांडतो. हे जगातील सर्वात मोठे लिखित राष्ट्रीय संविधान आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांचा विचार आणि कार्य याचा प्रभाव दिवसेंदिवस वाढत चाललेला आपल्याला दिसतो. त्याचा सर्वात जास्त प्रत्यय आला तो आणीबाणीच्या काळात . अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार करताना नागरिकांच्या मदतीला आले ते म्हणजे संविधान आणि संविधान दिलेला मूलभूत व्यक्तिस्वातंत्र्याचा अधिकार. यावेळी संविधानाचा संदर्भ घेतला गेला आणि त्याचबरोबर संविधानकर्त्याचा म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा! स्वातंत्र्योत्तर काळात आंबेडकर






अनुयायांपलिकडच्या भारतीयांनी घेतलेला हा संदर्भ त्यांच्या हक्कासाठी बाबासाहेब व त्यांनी मांडलेले व्यक्ती स्वातंत्र्यासंबंधीचे विचार याचा त्यांना आधार वाटला. पुढे पूर्ण आणीबाणी विरोधात लढणाऱ्या व्यक्तीला बाबासाहेब जवळचे वाटले. नंतरच्या पिढीसाठी आपल्या हक्कासाठी झगडणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला संविधान आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे त्यांच्या जगण्याचे आधार बनले.

जनतेचे संविधान जनतेला अर्पण केले ही विसाव्या शतकातील सर्वात मोठी घटना म्हणता येईल. ईश्वर, धर्म, राष्ट्रपिता, धर्मसंस्थापक यापैकी कोणाचा विचार मान्य न होता लोकांचा लोकार्पणाचा विचार पुढे आला. त्याचवेळी लोकशाहीमध्ये सार्वभौम जनता ही संकल्पना अधोरेखित झाली. त्याचबरोबर संविधानाची दिशा ठरवण्यात आली. समता, स्वातंत्र्य, बंधुभाव व न्याय या मूलभूत तत्वांशी नैतिक व कायदेशीर नाते बांधले गेले . उद्दिष्टांमध्ये ही तत्वे समाविष्ट करून त्याचा जागर केला गेला. समताधिष्ठित समाज रचनेचे बाबासाहेबांचे स्वप्न ही पहिली पायरी म्हणून राजकीय लोकशाहीतून व्यक्त झाले. सामाजिक आर्थिक लोकशाही कडे वाटचाल करण्याचा प्रारंभ म्हणून या राजकीय व्यवस्थेकडे बघितले गेले. आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी आर्थिक धोरणाची वाटचाल सुरू झाली. सामाजिक लोकशाही, समता प्रस्थापित करण्यासाठी प्रबोधन व त्याला आधार असणारी घटना कारणीभूत ठरली.

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर हे जगातील एक श्रेष्ठ संविधान तज्ञ होते. त्यांनी जगातील अनेक देशांच्या संविधानाचा अभ्यास केला होता. कायदा आणि संविधानाबाबत त्यांचा सूक्ष्म आणि सखोल अभ्यास होता. अप्रतिम आणि अद्वितीय असे भारतीय संविधान लिहिल्याबद्दल अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठाने मानद पदवी देऊन त्यांचा उचित गौरव केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधान लिहिले .तसेच संविधान सभेत संविधानातील कलमावर अभ्यासपूर्ण भाष्य केले. संविधान सभेतील सदस्यांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांची समाधानकारक आणि विचार प्रवृत्त करणारी उत्तरे त्यांनी दिली. याची प्रचिती संविधान सभेतील चर्चा वाचल्यानंतर येते. त्यांनी भारतीय संविधानातील विविध कलमांच्या संदर्भात केलेले भाषण हे आज देखील उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायधीशाकरीता मार्गदर्शक आहे. न्यायमूर्ती डॉ. आंबेडकरांच्या विधानांचा आधार घेऊन निर्णय घेतात. डॉ. आंबेडकर हे जागतिक ख्यातीचे संविधान तज्ञ होते. परंतु ते एका दिवसात संविधान तज्ञ बनले नाहीत .त्याकरिता त्यांनी जगातील विविध कायद्यांचा आणि संविधानाचा अतिशय चिकाटीने अभ्यास केला. त्यासाठी खूप परिश्रम घेतले. भारताला अधिक राजकीय अधिकार देण्याच्या संदर्भात विचार विमर्श करण्यासाठी एक आयोग नियुक्त करण्याची घोषणा इंग्लंडचे प्रधानमंत्री स्टेनले बाल्डविन यांनी केली. आणि 26 नोव्हेंबर 1927 ला भारतीय संविधानिक आयोगाची स्थापना केली. या आयोगाचे अध्यक्ष सर जॉन सायमन हे होते. म्हणून या आयोगाला सायमन कमिशन असे संबोधले जाते. सायमन आयोगाशी विचार विमर्श करण्यासाठी राज्यस्तरावर विधिमंडळ सदस्यांच्या एका समितीची निवड करण्यात आली. या सात सदस्यांच्या समितीवर डॉ. आंबेडकर यांची सदस्य म्हणून 5 ऑगस्ट 1928 ला मुंबई विधिमंडळातून निवड झाली. डॉ. आंबेडकरांचा अर्थशास्त्र आणि कायदा या विषयाचा सखोल आणि सूक्ष्म अभ्यास होता. त्यांनी राजकारणावरील काही पुस्तके वाचली होती. डॉ. आंबेडकरांना जाणीव झाली की आता भारतीय राजकारणात संविधानाचा विषय फार मोठ्या प्रमाणात चर्चेत येईल अशावेळी मौन राहणे अत्यंत धोक्याचे आहे. ते विचार करू लागले की सायमन आयोगाशी विचार विमर्श करण्याची संधी मला मिळाली आहे. म्हणून अस्पृश्यांच्या राजकीय हिताची सुरक्षा करण्यासाठी आणि देशाच्या राजकीय अधिकाराकरिता आपण काही भरीव कार्य केलेच पाहिजे. प्रदेश समितीवर निवडून आल्याचे जाहीर झाल्याबरोबर बाबासाहेबांनी 6 आणि 7 ऑगस्टला आपल्या काही मित्रांकडून 400 रुपये उधार घेतले. 8 ऑगस्टला तारापूरवाला बुकसेलर्सच्या दुकानातून 850 रुपयांची संविधानाशी संबंधित पुस्तके विकत घेतली. 9 ऑगस्ट पासून सकाळी आपल्या कार्यालयाच्या खिडक्या आणि दरवाजा बंद करून विकत घेतलेल्या 15 ते 20 ग्रंथांच्या अभ्यासाला ते बसले. काही लोक यायचे आणि दरवाजा ठोठवायचे. डॉ. आंबेडकर आपल्या त्रासिक मुद्रेने त्यांना परत जायला सांगत. काही वेळानंतर आणखी दुसरी लोकं यायचे. ते देखील दरवाजा ठोठावत .त्यांना देखील ते परत जायला सांगत. त्यामुळे संविधानाशी संबंधित ग्रंथाचा अभ्यास करण्यामध्ये अडथळा व्हायचा .आपल्या अभ्यासात लोकांचा त्रास होतो. ही बाब लक्षात घेऊन त्यांनी त्यांचे कार्यकर्ते मडकेबुवा यांना सांगितले की मडकेबुवा दरवाजाला बाहेरून कुलूप लावा. सकाळी, दुपारी आणि सायंकाळी इराण्याकडून मला खिडकीतून चहा देण्याची व्यवस्था करा. आणि दुपारचे व संध्याकाळचे जेवण देखील द्या.

डॉ. आंबेडकरांनी सांगितल्याप्रमाणे मडकेबुवांनी व्यवस्था केली. तसेच त्यांनी डॉ. आंबेडकर यांना सांगितले की, जर तुम्हाला काही कामासाठी माझी आवश्यकता वाटली तर मला बोलावून घ्या. मी कार्यालयाच्या बाहेरच्या बाकावर झोपून राहील. अशा प्रकारे कार्यालयाच्या दरवाजाला बाहेरून कुलूप लावून डॉ. आंबेडकरांनी सतत दोन आठवडे अभ्यास केला. संविधानाच्या अभ्यासाची सुरुवात त्यांनी अशा प्रकारे केली की , तारापूरवाला बुक सेलर्स कडून नंतर देखील नवीन पुस्तके खरेदी केलीत. पुढे या दुकानाची पुस्तके खरेदीची इतकी उधारी वाढली होती. आणी त्यांना उधारीचे पैसे परत करण्यासाठी 1936 मध्ये चारमिणार ही इमारत विकावी लागली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाची एकता आणि अखंडता टिकविण्यासाठी भारतीय राज्यघटनेत 352, 356, 360 अशी तीन कलमे समाविष्ट केली आहेत. वरील तीनही कलमे आणीबाणी विषयक असून 352 कलम म्हणजे परकीय राष्ट्रांपासून जेव्हा भारताच्या सार्वभौमत्वाला धोका निर्माण होतो. तेव्हा राष्ट्रपतींनी त्याचा वापर करून राष्ट्रीय आणीबाणी जाहीर करण्याचा अधिकार दिलेला आहे. 356 म्हणजे एखाद्या समूह किंवा एखाद्या राज्यात राजकीय अस्थिरता निर्माण झाली किंवा कोणतेही राज्य फुटीतावादी भूमिका घेत असेल तर त्यावेळेस केंद्र सरकारने 356 कलमाचा वापर करून त्या ठिकाणी त्या राज्यात आणीबाणी जाहीर करून तो प्रांत भारतापासून वेगळा होऊ नये किंवा राजकीय अस्तित्व निर्माण होऊ नये यासाठी या कलमाचा वापर केला जातो. जेव्हा राष्ट्रीय आर्थिक संकट निर्माण होते तेव्हा ते संकट दूर करण्यासाठी राष्ट्रपती 360 कलमाचा वापर करतात. वरील तीनही कलमांपैकी 356 कलम हे राष्ट्रीय एकता आणि अखंडतेसाठी अतिशय महत्त्वाचे आहे .गेल्या सहा दशकांपासून भारत आपल्यास एक संघ दिसतो तो केवळ 356 या कलमा मुळेच. जम्मू काश्मीर, पंजाब, उत्तर पूर्व राज्य आज भारतात आहेत.

याचे महत्त्वाचे कारण 356 कलम हे होय. या कलमांबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेत अतिशय महत्त्वाची भूमिका मांडली आहे. त्याचबरोबर या कलमांबाबत धोकाही त्यांनी सांगितला आहे. भारतासारख्या बहुजातीय, बहुधर्मीय लोकसंख्या असलेल्या देशाची जर एकता आणि अखंडता टिकवायची असेल तर केंद्र सरकार हे प्रबळ असले पाहिजे. वेगवेगळ्या वादांमुळे अंतर्गत सुरक्षा व्यवस्थापन करणे कठीण होत आहे. दहशतवाद, नक्षलवाद हे प्रश्न अधिक कठीण होत आहेत. त्यामुळे पुन्हा आपल्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराकडे जाणे अतिशय गरजेचे झाले आहे.

# भारतीय संविधानाचे रक्षण करणे गरजेचे



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आधुनिक केसरी

**आज २६ नोव्हेंबर 'संविधान दिन' म्हणून जिकडे तिकडे उत्साहाने साजरा केला जातो. पण आज महाराष्ट्रातलेच नव्हे तर देशातले वातावरण प्रचंड गढूळ झाले आहे.जिकडे तिकडे धार्मिक आणि जातीय उन्माद फार बोकाळला आहे. ज्यांना आम्ही निवडून दिले आहे ते लोकप्रतिनिधीही आणि राजकीय पक्षांचे कार्यकर्ते काहीही वाट्टेल तसे बरळताना दिसत आहेत. भारतीय संविधानाची त्यांनी शपथ घेतली आहे. त्याची त्यांना मात्र कुठल्याही प्रकारची जाण आणि भान दिसत नाही.**

केवळ फक्त भोंगा आणि हनुमान चालीसा वाचा. कधीही देवळात जात नाहीत. देवाच्या पाया पडत नाहीत. आशा मुद्द्यावर राजकारण केले जात आहे. काहीजण तर मी किती प्रतिगामी आहे आणि ते किती खोटे पुरोगामी आहेत हे सांगण्याचा प्रयत्न करत आहेत नव्हे तर जणू काही त्यांची शर्यतच लागली आहे असे दिसते.त्यामुळे देशातले वातावरण प्रचंड दूषित झाले आहे. माणूस माणसाकडे द्वेष नजरेने पाहत आहे. यामध्ये मात्र ज्यांचे हातावर पोट आहे,गरीब आहेत अशी सामान्य जनता मात्र आगीत होरपळून निघावी तशी अनेक संकटात व समस्यात ती होरपळताना दिसत आहे.त्यांना खायला काही नाही.कामधंदे नाहीत.बेकारी वाढली आहे. सुशिक्षित बेरोजगारांना नोक-या नाहीत.तरुणांच्या हाताला काम नाही. महागाई प्रचंड वाढली.शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळत नाही. आरोग्याच्या सुविधा फार कमी आहेत. शाळा महाविद्यालयाची दैन्यावस्था गोरगरिबांना शिक्षण नाही. असे अनंत प्रश्न तोंड वर काढत आहेत.त्यांचा विचार मात्र कुठल्याही लोकप्रतिनिधींना,राजकारण्यांना किंवा सरकारला नाही. ज्यांच्या जीवावर हे लोकप्रतिनिधी निवडून आले आहेत. ते मात्र सत्तेच्या जोरावर सत्तेसाठी मस्ती करताना दिसत आहेत. स्वार्थ आणि मतलबासाठी जनतेच्या प्रश्नांना बगल देताना दिसतात. संविधानाची पायमल्ली करताना दिसत आहेत आणि उलट तेच सविधानांवर बोलताना दिसत आहेत. सविधान मूल्य पायदळी तुडवताना दिसत आहेत. दिल्लीसारख्या ठिकाणी तर संविधान जाळले जाते आहे.ज्यांच्यामुळे आमचे कल्याण होणार आहे त्या संविधानाचे महत्व अजुनही सामान्य जनतेला माहित नाही.ते संविधानाबाबत आपल्या हक्क,कर्तव्याबाबत जागरूकही नाहीत.

त्यामुळेच देशातील जातीय,धर्मवादी यांचे फावते आहे. जो तो धर्माचा वापर राजकारणासाठी करताना दिसतो आहे. सामान्य जनतेला मात्र यामध्ये विनाकारण गोवले जात आहे. त्यांना अत्यंत पद्धतशीरपणे यामध्ये वापरून घेतले जात आहे. त्याला अनेक जण बळी पडत आहेत. त्यामुळे तेही स्वतःच्या पायावर स्वतःचा धोंडा मारून घेत आहेत. अनेक जण तर सविधान साक्षरते पासून कोसो दूर असल्याने त्यांना मात्र मानवतेची,मूल्याची जाणच झालेली दिसत नाही. त्यामुळेच प्रत्येकाने भारतीय संविधान वाचणे आज काळाची गरज निर्माण झाली आहे. 26 जानेवारी 1950 पासून आपल्या देशाने प्रजासत्ताक म्हणजे लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केला आहे. भारतीय संविधानाने एकंदरीत सर्व नागरिकांना मूलभूत हक्क प्रदान केले आहेत. भारतीय संविधान म्हणजे जगातील समग्र मानव कल्याणकारी मूल्यांचा अर्क आहे. आजही आम्ही सविधानाकडे केवळ फक्त कायद्याचाच ग्रंथ आहे अशा मर्यादित अर्थाने पाहतो. डॉ.अनंत राऊत म्हणतात की,' संविधान हा आपला उदात्त असा सामाजिक व सांस्कृतिक दस्तावेज आहे.' मानवाला मानवी कल्याण साधायचे असेल तर प्रत्येकाने आपल्या जीवनामध्ये संविधानिक नैतिक मूल्यांची जोपासना करणे ही काळाची गरज आहे. मानवी जीवनामध्ये काही प्रजासत्ताक नैतिक मूल्यांची जोपासना करून जीवन जगले पाहिजे आणि इतरांनाही जगू दिले पाहिजे. मूल्य दोन प्रकारचे असतात एक चिरंतन मुल्य व दुसरे तात्कालिक मूल्य.तात्कालिक मूल्यामध्ये ईश्वरनिष्ठा, स्वामीनिष्ठा, आरत्या, धर्म, अंधश्रद्धा,जातीयता अशा प्रकारची मूल्य येतात. आपण भारतीय संविधानाचा स्वीकार केलेला आहे.त्यामुळे आपल्याकडे लोकशाही मूल्ये अस्तित्वात आहेत.

लोकशाही मूल्यामध्ये राष्ट्रनिष्ठा, बुद्धिप्रामाण्यवाद, विवेकनिष्ठा,स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही मूल्य येतात. लोकशाहीतील मूल्य ही चिरंतन मूल्ये आहेत. पण जे तात्कालिक मूल्य आहेत, जे टिकणारे नाहीत, ज्यामुळे मानवी कल्याण साधता येणार नाही अशा मूल्यांची पेरणी करण्याचा आणि आचरणात आणण्याचा प्रयत्न आजचा माणूस करताना दिसतो आहे. भरतीय संविधान एक संस्कार ग्रंथ आहे. त्यातील मूल्याची जपणूक प्रत्येकाने केली पाहिजे.त्याप्रमाणे वागले पाहिजे. त्याप्रमाणे शासन व्यवस्था चालली पाहिजे तरच खऱ्या अर्थाने समाजामध्ये अमुलाग्र बदल झाल्याशिवाय राहणार नाही. भारतातील प्रजासत्ताक मूल्यांमध्ये स्वातंत्र्य हे मुल्य फार महत्त्वाचे आहे. हे मुल्य समाज जीवनातील आणि मानवी जीवनातील अत्यंत मूलभूत आणि चिरंतन असे मानवी मूल्य आहे. पण या मूल्याचा काहीजण अधिकाधिक वापर करून बलशाली होण्याचा प्रयत्न करून इतरांना दुबळे करण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत.' प्रत्येक व्यक्तीला स्वतःचा संपूर्ण विकास करून घेण्याची समान संधी म्हणजे स्वातंत्र्य होय'.असे असतानाही सामाजिक स्वातंत्र्य,धार्मिक स्वातंत्र्य,राजकीय स्वातंत्र्य व आर्थिक स्वातंत्र्य यामध्ये काहींचे वर्चस्व आहे. गरीब गरीब होत चालला आहे. श्रीमंत श्रीमंत होत चालला आहे. त्यामुळे स्वातंत्र्याचा अर्थ मर्यादितच राहिला आहे तो सर्वसामान्यांपर्यंत पोहोचला नाही, पोहोचविला नाही आणि पोहोचूही दिला जात नाही. त्यामुळे शासनस्तरावरून त्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. आपल्या देशात वर्णव्यवस्था ,जातीव्यवस्था आणि अस्पृश्यतेच्या माध्यमातून असंख्य लोकांचे आजही सामाजिक स्वातंत्र्य हिरावून घेतलेले दिसते. त्यामुळे भारत देशाचे खूप पुढे नुकसान झाले आहे. आजही या गोष्टी समाजव्यवस्थेमध्ये दिसून येतात. त्या हद्दपार करणे काळाची गरज आहे. माणसांनी निर्माण केलेल्या देवावर,धर्मग्रंथावर सर्वच माणसाला नैसर्गिक अधिकार असायला हवा. परंतु आपल्या देशामध्ये स्त्रियांना व शूद्रांना धर्मस्वातंत्र्य नाकारले होते. ज्ञान घेणे प्रत्येक माणसाचा नैसर्गिक हक्क जरी असला तरी स्त्रियांना -शूद्रांना वेद वाचण्याचे, ऐकण्याचे,बोलण्याचे स्वातंत्र्य नाकारले होते. धार्मिक स्वातंत्र्यावर बंधने लादल्यामुळे देशांत असंख्य माणसाना स्वतःचा विकास करून घेता आला नाही परूंतु भारतीय संविधानाने प्रत्येक व्यक्तीला ज्ञान मिळवण्याचे, धर्माची उपासना करण्याचे, धर्माचे ज्ञान मिळवण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. हुकूमशाही व राज्यशाही शासनव्यवस्थेत राज्यातील सर्वच व्यक्तींना राजकीय स्वातंत्र्य मिळत नाही. लोकशाही राज्यव्यवस्था मात्र प्रत्येक व्यक्तीला राजकीय स्वातंत्र्य देते.राजकीय स्वतंत्र्यामध्ये राज्यकर्ता निवडण्याचा अधिकार व्यक्तीला असतो. राज्य कारभारातही सहभागी होता येते. भारतीय संविधानामुळे विशिष्ट वर्ग,जात या वर्गातील व्यक्तीला दूर ठेवता येत नाही. मानवाला विकास करण्यासाठी आर्थिक स्वातंत्र्यही महत्त्वपूर्ण असते प्रत्येक नागरिकाला स्वतःच्या चरितार्थासाठी ,आर्थिक विकासासाठी स्वतःच्या कुवतीनुसार,निवडीनुसार उद्योग करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे पण पूर्वी जातिव्यवस्थेने हे स्वातंत्र्य नाकारले होते परंतु भारतीय संविधानाने मात्र ते स्वातंत्र्य प्रत्येक व्यक्तीला दिले आहे. त्याचा योग्य वापर करणे महत्त्वाचे आहे. समता हे श्रेष्ठ मानवी मूल्य म्हणून सर्वांनी स्वीकारले असले तरी आजही समता प्रस्थापित झालेली दिसत नाही. आजही अनेकांच्या मनामध्ये धर्म,जात,भाषा याची अडी दिसून यायला लागते. त्यामुळे आपल्या मनातील जातीय,धार्मिक,भाषिक अशा विविध स्वरूपाचा असलेला भेदभाव काढून टाकून प्रत्येकाने चांगले जगले पाहिजे, जगू दिले पाहिजे तरच प्रगती दिसून येईल. एका आईच्या पोटी जन्माला आलेली मुले एकमेकाशी अत्यंत प्रेमाने वागतात. अगदी त्याचप्रमाणे विविध जाती-धर्मांच्या माणसांनी एकत्र वागणे,राहणे, जगणे फार महत्वाचे आहे. परंतु तिरंगा झेंडा पाहिला की मातृभूमी बद्दलचा अभिमान भरून येतो. हा दिवस सोडला तर आम्ही एकमेकांचे बांधव आहोत हे विसरून जातो धार्मिक,जातीय,भाषिक,प्रांतीय अस्मिता जागृत करतो हे वाईट आहे. त्यासाठी भारतीय राज्यघटनेतील समतावादी मुल्ये लोकमनावर खोलवर रुजविणे महत्त्वाचे आहे. भारतीय संविधानातील बंधुत्व हे मूल्य सांस्कृतिक उपक्रम व प्रसारमाध्यमाद्वारे जनमानसात रुजविणे फार महत्त्वाचे आहे. त्यासाठी शाळा, महाविद्यालयातून, अभ्यासक्रमातूनही भारतीय संविधानाचा परिचय करून देणेही महत्त्वाचे आहे. न्याय हे मानवी जीवनातील अत्यंत महत्त्वाचे मूल्य आहे. अन्याय करणाऱ्या ज्या ज्या गोष्टी आहेत त्या त्या न्याय वाटत होत्या. उदाहरणार्थ बालविवाह,सती, विधवा पुनर्विवाह प्रथा. संविधानाने मात्र त्यांना मूठमाती दिली. खरेतर प्रत्येक भारतीयांनी संविधानाच्या चौकटीत वागण्याचा प्रयत्न केला, प्रजासत्ताक मूल्यांची पेरणी करण्याचा प्रयत्न केला तर देशाचा कायापालट झाल्याशिवाय राहणार नाही यात तिळमात्रही शंका नाही. प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने भारतीय संविधान, त्यातील नैतिक मूल्य प्रत्येकाने समजून घ्यायलाच हवीत. त्यांची अंमलबजावणी करायला हवी तरच देश प्रगतीपथावर जाईल.

# नतचथीरम नागरगीरधू

आधुनिक केसरी

**समकालीन भारतीय समाजामध्ये प्रेम हा फक्त लिखाणाचा आणि चर्चेचा विषय आहे. प्रत्यक्ष कृती करण्याचा नाही. प्रत्यक्ष कृती केली तर त्याचे पडसाद हे हिंसक असतात. प्रेमासारख्या सुंदर भावनेला मानवनिर्मित जात, धर्म, पंथ व भेद याचे कोणतेही नियम लागू होत नाहीत हे समजण्याइतपत सामाजिक भान सर्वसामान्य माणसांमध्ये दिसून येत नाही. ही भावना समजून न घेण्य पाठीमागील विविध कारणे व त्याचे समाजावर उमटलेले पडसाद याचा आकृतिबंध उलगडणारा एक चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला. हा चित्रपट अनेक बाजूंनी सध्याचे सामाजिक वास्तव मांडणारा आहे. जातीव्यवस्थेची चिकित्सा, धर्म व्यवस्थेची चिकित्सा व त्या पाठीमागील राजकारण परखडपणे मांडण्याचा प्रयत्न या चित्रपटात केला आहे. सामाजिक विषमता आणि प्रेम याचा अन्वयार्थ लावत समलिंगी,पारलैगी इत्यादी प्रेमाच्या विविध स्वरुपान्विषयी गांभीर्याने विचार करायला लावणारा “नतचथीरम नागरगीरधू” हा पा. रंजीथ यांचा तमिळ भाषेतील चित्रपट नुकताच नेटफ्लिक्स वर प्रदर्शित झाला. एकविसाव्या शतकामध्ये प्रबोधनाच्या परंपरेचा प्रभाव असलेली पिढी ज्या भूमिका घेऊन जगते त्या भूमिका साकारणारी पात्र या चित्रपटामध्ये आहेत. चित्रपटात रेने एक आंबेडकरवादी मुलगी व अर्जुन हा उच्चवर्णीय जात, धर्म आणि पितृसत्ता याच्या पलीकडे जाऊन समतेची भूमिका स्वीकारत असलेला तरुण आहे.**

या चित्रपटामध्ये दिग्दर्शक एक नाटक बसवताना दिसत आहे. हे नाटक म्हणजे कुणीतरी स्क्रिप्ट लिहून मग नाटक बसवणे हा प्रकार नाही. दिग्दर्शक आणि नाटकातील कलाकार मिळून नाटक विकसित करतात. आयुष्यातील अनुभवांना अभिव्यक्त करतात. प्रेम आणि समकालीन सामाजिक जात वास्तव यावर आधारित नाटक आहे. प्रेमाचा जातीशी असणारा संबंध, प्रेमाचा समतेशी असणारा संबंध या दोनही बाजू स्पष्टपणे मांडणारा हा चित्रपट आहे. चित्रपटामध्ये रेने ही शेड्युल कास्ट मधील शिकलेली आणि सामाजिक भेदभावांना सामोरे गेलेली कणखर मुलगी आहे. रेने व इनीयन यांची जेव्हा भेट होते तेव्हा इनियन तिला विचारतो की तुझं नाव तमिल आहे तर तू रेने हे नाव का घेतलंस. रेने म्हणते 100 years of solitude या gabriel garcia यांच्या पुस्तकांमध्ये रेनेटा हे एक पात्र आहे त्या पात्रावरून रेने हे नाव तिने घेतले आहे. रेनेटा हे पात्र पारंपरिक विचारांना झुगारून तिच्या प्रेमा विषयीच्या प्रामाणिकपणासाठी प्रसिद्ध आहे. रेने संपूर्ण चित्रपटांमध्ये सतत वाचन करणारी मुलगी दाखवलेली आहे. तिचा अभ्यास खूप दांडगा असल्यामुळे तिच्या विचार करण्याच्या प्रक्रियेमध्ये बदल झालेले आहेत. चित्रपटाच्या सुरवातीच दृश्य रेने आणि इनियन यांच्या शाब्दिक चकमकीच आहे. इनियान तिला बोलण्यात हरवू शकत नाही तेव्हा त्याच्यातील पुरुषी अहंकार हा रेनेच्या जात वस्तवावर टीप्पनी करतो. ‘तुझं नेचर बदललं नाही’ याचा अर्थ तू एका विशिष्ट जातीची असल्यामुळे तुझं नेचर अस आहे हे त्याला म्हणायचं असतं त्यामुळे रेने ही त्याच्याशी असलेला संबंध तोडून अगदी जिद्दीने उभी राहते.

अर्जुन सुरवातीला पारंपरिक पुरुषी विचारांचा आणि जाती व्यवस्थेचा पगडा असलेला एक सवर्ण मुलगा असतो. नाटकाच्या निमित्ताने रेने, अर्जुन, इनियन, ट्रान्सजेंडर आणि समलिंगी जोडपे सर्व एकत्र येतात. ज्या थेटर मध्ये हे नाटक बसवतात त्या थेटरची रचना ही वैशिष्ट्यपूर्ण आहे. थेटरच्या दरवाज्याचा आतील भाग हा पूर्णपणे गौतम बुद्धांच्या पेंटिंग ने रंगवलेला आहे. याचाच अर्थ त्या थेटर मधील वातावरण हे समता बंधुता या विचारांचे आहे. त्या थेटर मध्ये येणारा व्यक्ती हि त्या थेटर मधून बाहेर जाताना मात्र प्रबुद्ध होऊन बाहेर जाते हे दिग्दर्शकाला सुचवायचे आहे. त्या थेटर मध्ये घडत असलेली नाट्यकलाकृती प्रेम या वैश्विक भावनेसाठी अतिशय कणखर भूमिका घेणारी आहे.

मुलगा किवा मुलगी जेव्हा प्रेमात पडतात. तेव्हा जात, धर्म आणि इतर कोणत्याही गोष्टीचा विचार त्यांच्या मनात नसतो कारण हि भावना नैसर्गिक आहे. जेव्हा ते हि भावना घरी सांगतात तेव्हा घरच्यांच्या ज्या प्रतिक्रिया येतात त्या प्रतिक्रियांना दर्शवणारे एक दृश्य चित्रपटात आहे. यामध्ये दोन्हीही घरांमध्ये सर्वात पहिल्यांदा राग आणि तणावाची परिस्थिती निर्माण होते. तो मुलगा किंवा ती मुलगी कोणत्या जातीची आहे हे विचारलं जातं. त्याचबरोबर त्या घरातील आईला दोष दिला जातो की, तुझ्यामुळे हे सगळ झालं तू नीट संस्कार केले नाहीस. मागच्या संपूर्ण पिढ्यांच्या कर्तृत्वाचा पाढा वाचला जातो की, आपल्या संपूर्ण पिढ्यांमध्ये आजपर्यंत असं कोणीही केलेलं नाही. असं करण्याचा जर कोणी प्रयत्न केला तर त्याला मृत्यू हीच शिक्षा दिली जाते याची उदाहरण दिली जातात. फोटोत असणारे आजी, आजोबा, काका हे सुद्धा हे सुद्धा सक्रीय होतात. जाती बाहेर प्रेम केल म्हणून मुलीला मारणे हा एकमेव उपाय आहे असे सांगतात. हे सामाजिक वास्तव मांडणारी परिस्थिती या चित्रपटामध्ये दाखवलेली आहे. जेव्हा मुलगा किंवा मुलगी दुसर्या जातीच्या व्यक्तीच्या प्रेमात असते आणि हे घरी कळतं तेव्हा त्यांना त्याच्या कुटुंबात पाठीमागे कसं घडलं, काय घडलं पूर्वज जातीव्यवस्था टिकवण्यात किती प्रामाणिक होते. त्यांनी घराची संस्कृती परंपरा कशाप्रकारे जपली हे सांगून आजच्या पिढीला लगाम घालण्याचा प्रयत्न केला जातो. म्हणजे पूर्वज जिवंत अस्तित्वात नसले तरी जात जिवंत ठेवण्यासाठी त्यांच्या नसण्याचा सुद्धा वापर केला जातो हे पा. रंजीथ यांनी अतिशय सुंदरपणे चित्रित केले आहे. नाटकातील रेने ही प्रेम झालेली मुलगी जेव्हा देवातेकडे जाते आणि म्हणते की मला काहीतरी मार्ग दाखव तेव्हा ती देवता म्हणते की, मी तुझी मदत करू शकत नाही कारण मी सुद्धा प्रेम केलं होतं आणि या लोकांनी मलाही असंच मारलं व मला पूज्य म्हणून घोषित केलं ही घटना फार महत्त्वाची आहे. कारण आपल्या आजूबाजूला जे काही ग्रामीण भागातील स्थानिक पूज्य स्थळ आपल्याला दिसतात जे परंपरेप्रमाणे चालत आलेले व त्यांच्या त्यागाच्या महतीच्या आखायिका आहेत. ग्रामीण भागातील देवत्व असलेल्या मुर्त्यांचा कुठेतरी इतिहास हा विद्रोहाशी जोडलेला आहे. प्रथा आणि परंपरा नाकारणाऱ्या माणसांना मृत्युदंडाची शिक्षा दिल्यानंतर त्यांच्या मृत्यूला कुठेतरी धार्मिक स्वरूप प्राप्त करून दिले जाते हे वास्तव पा रंजीथ यांनी चित्रपटातून मांडलेला आहे. या घटनेनंतर या चित्रपटांमध्ये एक अतिशय सुंदर गाणं आहे. ज्यामध्ये एक वयोवृद्ध स्त्री गाणं म्हणताना दिसते ते गाण अश्याच प्रकारे मारल्या गेलेल्या व देवत्व प्राप्त झालेल्या स्त्रियांचं मनोगत मांडणारे आहे. ती म्हणते की, ‘तुम्ही बघता रात्रंदिवस दिवा जळतो आमच्या समोर पण आमचं दुःख तुम्हाला माहित नाही’. प्रेम समाजाला मान्य नसते साधू, संत, देवी किवा देवता प्रेम करणार्याच्या जातीचा प्रश्न सोडवण्यासाठी मदत करू शकत नाही. एका संध्याकाळी अर्जुन रेने चा अवमान करतो. त्यामुळे त्याला नाटकातून काढून टाकता. पण रेने म्हणते कि नाही अर्जुन ला त्याच्या चुकीची जाणीव आहे त्यामुळे त्याला एक संधी द्यायला हवी. बदल किवा परिवर्तन हे प्रत्येक क्षणाच्या कृतीतून होत असते. आपण सुधारण्याची संधी द्यायला हवी. सर्वाना ते पटत आणि अर्जुन थांबतो. नाटकातील रेने चा दुसर्या जातीतील मुलावर प्रेम केल म्हणून बळी द्यायचं ठरते, तिला बळी देताना अर्जुन जो नाटकात रेनेच्या वडिलांची भूमिका करत असतो तो म्हणतो की या नाटकामध्ये मी माझ्या मुलीचा बळी देणार नाही. अस आपण दाखवू ‘सुधारलेला बाप’ हि संकल्पना सर्वांना आवडते. आज काही पालक जातीच्या पलीकडे जाऊन मुलांचे आंतरजातीय व आंतरधर्मीय प्रेम स्वीकारतात पण त्याचे प्रमाण फार कमी आहे. अर्जुन मध्ये झालेला बदल फार महत्त्वाचा आहे. तो संध्याकाळी रेनेला भेटतो आणि म्हणतो की रेने थँक् यु तुझ्यामुळे मला सुधारण्याची संधी मिळाली. रेने ही अर्जुन ला जेवायला घेऊन जाते तेव्हा थेटरचा दरवाजा उघडतो आणि बाहेरून प्रकाश येतो आणि त्या प्रकाशात रेने आणि अर्जुन दोघेही जातात हे खूप महत्त्वाचे दृश्य या चित्रपटामध्ये आहे. उच्चवर्णीय समूहातून आलेल्या अर्जुन मध्ये प्रबुद्ध बणन्याच्या दिशेने झालेला प्रवास महत्वाचा आहे. रेने शिकलेली आणि सुसंस्कृत मुलगी आहे. सामाजिक परिवर्तन हे पुस्तक वाचून किंवा अन्याय करणाऱ्या समूहाविषयी कायम विरोधाची भूमिका घेऊन परिवर्तन शक्य होत नसतं तर त्यांना स्वतःला परिवर्तित करून घेण्याची संधी देणे त्यांच्यावर विश्वास ठेवणे हे महत्वाच असत याची जाणीव सुद्धा रेनेला आहे. तिच्या याच विश्वासामुळे अर्जुन हा एक उच्च वर्णीय पितृसत्ता कुटुंबातील मुलगा हळूहळू समतेच्या बाजूने आणि स्त्रीदास्य शोषणाच्या विरोधात उभा राहतो दिग्दर्शकाने अत्यंत शिताफीने चित्रपटामध्ये मांडलेले आहे.




दोघ जेवायला जातात तेव्हा रेनी बीफ ऑर्डर करते अर्जुनला विचारते तू खाशील का ? अर्जुन ला काय बोलावं हेच कळत नाही. तो म्हणतो तू छान बोलतेस तुझं वाचन खूप आहे. तू कम्युनिस्ट आहेस का ? रेने म्हणते मी आंबेडकराइट आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेचा प्रभाव रेनेवर आहे बाबासाहेबांच्या शिक्षणाविषयी व वाचनाविषयीच्या परंपरा इथल्या खालच्या घटकाच्या आयुष्यातला अतिशय महत्त्वाचा भाग बनलेल्या आहेत. त्यामुळे रेने ने स्वाभिमानाने दिलेले उत्तर आज शेड्युल कास्ट मधील सर्व मुलींचे प्रतिनिधित्व करते. चित्रपटाची कथा पुढे जाते तेवढ्यात अर्जुन ला त्याच्या आजीसाठी घरी जावं लागतं तो घरी जातो पण जाण्यापूर्वी रेनेला भेटतो आणि तीला म्हणतो की तू वेगळी आहेस तु जे दाखवतेस त्यापेक्षा वेगळी आहेस. रेने म्हणते तुला असं म्हणायचं आहे का की मी ब्रोकन मिरर आहे तर हो मी ब्रोकन मिरर आहे पण मी स्वतःला रिक्रिएट केलेला आहे कारण मला तास बनण्याची गरज आहे. लहानपनातील एका अस्पृश्य मुलीचं जगणं. त्या जगण्यातून घडलेलं तिचं भावविश्व सांगताना रेने म्हणते की, शाळेतून घरी जाताना शेतातील रस्त्यावरून उच्चवर्णीय पुरुष समोरून चालत आला तर रस्त्याच्या बाजूला व्हावं लागत असे. रस्त्यावरून चालताना सुद्धा चालताना इतरांपासून अंतर ठेवून चालावं लागत असे. विहिरीत आंघोळ करताना विहिरीतलं पाणी आमच्यामुळे अस्वच्छ होत असे. झाडाची फळ घेताना सुद्धा जातीवाचक बोलाल जात असे, शिक्षिका जेव्हा विचारात काय जेवण केल तर बीफ या शब्दाचाही त्यांना तिरस्कार वाटत असे.वडील शाळेत ड्रम वाजवायला आले तेव्हा सर्व मुले मला खूप हसली. कॉलेजमध्ये स्कॉलरशिप घेते म्हणून अवमान व्हायचा. सर्व मित्र मैत्रिणी एकमेकांचे डबे मिळून जेवायचे पण माझ जेवण कुणीही शेयर करत नव्हत आणि जेव्हा इनियन वर मी मनापसून खूप प्रेम केल तेव्हा त्यानेही मला माझ्या जातीवरून डीवचल जात हि कायम सावली सारखी मला चिकटून आहे त्यामुळे या झालेल्या अपमानामुळे मी खूप खचले होते आणि शेवटी मी स्वताला पुन्हा एक खंबीर व्यक्ती म्हणून माझी नवीन ओळख निर्माण केली. भारतीय सामाजिक नियमांनी गावकीची काम करणाऱ्या समाजाला मेलेल्या जनावरांचे मास खाणे हाच एक पर्याय ठेवला होता. स्वताला उन्नत करण्यासाठी कोणतेही मार्ग त्यांच्याकडे जाती व्यवस्थेने ठेवले नव्हते. त्यामुळे बीफ हेच त्यांचे अन्न आणि कमी दर्जाची कामे करणे हेच त्यांच्या वाट्याला आले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे गावाबाहेर राहणाऱ्या लोकांमध्ये बदल झाले. शिक्षणामुळे त्यांच्या राहण्यात, वागण्यात, बोलण्यात व विचार करण्याच्या प्रक्रियेत बदल झाले. रेने हि शेड्युल कास्त मधील मुलगी या सर्व सामाजिक प्रक्रियेचे प्रतिनिधित्व करते. अर्जुनच्या लग्नाचा व त्याच्या आजीने घेतलेल्या निर्णयाचा किस्सा फार मजेदार आहे तो बघितल्यावर आपल्याला खळखळून हसायला येत. चित्रपटामध्ये प्रेम आणि समकालीन वास्तव या विषयावरच नाटक तयार होत. नाटक सदर होत असताना त्याला हि विरोध होतो. एकंदरीतच संपूर्ण चित्रपट हा प्रेक्षकांना खिळून ठेवणारा आहे. चित्रपटातील गाणी फार मार्मिक आहेत. वास्तविक सामाजिक चित्रण दाखवणे या सोबतच समाजाला घडवण्याचं कामही चित्रपट करत असतात कलाकृती समाजावर कोणत्या प्रकारचे संस्कार करते यावर तीच मूल्य ठरत असत. पा. रणजीत यांचा ‘नतचथीरम नागरगीरधू’ हा चित्रपट समकालीन वास्तव मांडणारा तसेच सकारात्मक पैलू समोर आणणारा आहे.हा चित्रपट सर्वांनी बघावा त्याच बरोबर हो हिंदी मराठी मध्ये सुद्ध प्रदर्शित व्हावा जेणे करून एक गंभीर विचार सर्वसामान्यान समोर चर्चेला येईल.

डॉ. सुनिता सावरकर
औरंगाबाद

# बहुजनांचे जागृत दैवत सातार्‍याचा खंडेराय

आधुनिक केसरी

दिवाळी झाली रं झाली की यात्र उत्सवाला धुमधडाक्यात सुरुवात होतेय, पण मागील दोन ते तीन वर्षापासून या यात्रा उत्सववर गडांतर आले होते का तर २०१९ ते २०२१ या कालावधीत कोरोना या महासावटामुळे सर्वच यात्रा राज्यभरातील भरण्यास बंदी होती. यानुसार जेजुरी व सातार्याची खंडोबा यात्रा करण्यास मज्जाव होता. मागील तीन वर्षानंतर प्रथम यावर्षी ही यात्रा खुल्या वातावरणात भरत आहे.

सातार्याच्या आजुबाजूला डोंगर असून दोन्ही बाजूस लहान तलाव आहे. सध्याच्या थंडीने, वृक्षबहाराने नैसर्गिक वातावरण भारावून गेले आहे. याच नयनरम्य परिसरात केंद्रस्थानी सातारा स्थित खंडेराय दैवताचे भव्यदिव्य मंदिर आहे. तसेच सातारा परिसर हा मनपात समाविष्ट झाल्यामुळे प्लॉट, घरे, रो-हाऊसेस, कॉलनी, वस्ती, वसाहती झपाट्याने विकसित होत आहे. असो यापूर्वी यळकोट यळकोट जय मल्हार म्हटले की हे धनगराचेच दैवत आहे असे अनेकांना वाटायचे. पण तसे काहीही नाही. अनेक जाती-जमाती या दैवतास कुलदैवत म्हणून मानतात. तसेच अनेकांच्या नवसाला पावणारा जागृत खंडोबा म्हणून याची ख्याती आहे. अठरापगड जाती-जमाती, आदिवासी समाज, बुरुड समाज, मराठा, ब्राम्हण, वाणी अर्थात सकल बहुजन भक्ताचे जागृत दैवत म्हणून सातारा खंडेरायास मानतात.

सद्यस्थितीत मुला-मुलींचे लग्न ठरले की, जागरण, गोंधळ मल्हारी मार्तंड यांच्या नामे घातले जाते. तसेच वधु-वर हे सातारा खंडोबा किंवा जेजुरीच्या खंडेरायाच्या दर्शनाला जातात. यामागे वधु-वरांचे वैवाहिक जीवन सुख-समाधानात जावे ही भावनिक श्रध्दा असते. खंडेरायाची यात्रा का भरते ? चंपाषष्टी दिनीच का साजरी केली जाते ? यात्रेला चंपाषष्टी असे का म्हणतात या मागे मोठी आख्यायिका आहे. पुराणकाळात दैत्यांनी सगळीकडे उन्माद व उच्छाद मांडला होता. त्यात मनी व मल्ल हे दुष्ट, दुराचारी नितीचे दैत्य होते. परंतु या दोन्हीही दैत्यांनी कठोर तपश्चर्या करुन ब्रम्हदेवाला प्रसन्न केले. तत्क्षणी अमर होण्याचा वर मागिला. या वर प्राप्तीमुळे त्यांना सर्वोच्च शक्ती प्रदान झाली. या शक्तीच्या जोरावर हे दैत्य अहंकारीव गर्वाभिमानी झाले. इंद्र, अप्सरा, देवी, देवतांस त्रास देण्यास सुरुवात केली. त्यांच्या या दुराचारी, कुकृत्यापासून मुक्ती मिळावी म्हणून इंद्र देवाने शिवशंकराकडे मदतीची याचना केली. शिवशंकराने तात्काळ मार्तंड भैरव अवतार धारण करुन तिसरा डोळा उघडत ते नंदीवर आरुढ झाले. मनी व मल्ल या दैत्या बरोबर प्रखर युध्द केले. या युध्दात दैत्य हतबल होऊन त्यांचा वध झाला. यामुळे ऋषीमुनीही सुखावले. त्यांनी मार्तंड-भैरवास विनंती केली, ज्या ठिकाणी दैत्याचे निर्दालन झाले त्या ठिकाणी कायमस्वरुपी वास्तव्य करावे. ज्यामुळे भक्तंच्या मनी देवाचे अस्तित्व राहून ते निर्धास्त व बिनधोकपणे जीवन जगू शकतील. त्यांच्या या विनंतीला मान देऊन मार्तंड भैरवाने लिंगरुपे निर्माण केली. तो दिवस ती तिथी म्हणजे शुध्द षष्टी रविवार. नक्षत्र शततारका चंपाषष्टी हा होय. तेंव्हापासून तर आजपर्यंत रविवार हा खंडेराय या दैवताचा मानला जातो. तसेच हे दैवत बहुजन भक्ताच्या नवसाला पावते म्हणून जागृत खंडेराय दैवत असे म्हटले जाते. आज चंपाषष्टी दिनी खंडेरायाची पूजा करुन तळी उचलून खालील गीत म्हणतात.

***अमड दुध नगारा सोन्याची जेजुरी***
***मस्तकी मोत्यांचा तुरा देव गेले जेजुरा***
***निळा घोडा पाव मे तांडा***
***कंबरी करगुटा केली हिरा मस्तकी तुरा***
***अंगावरी शालू सदाही लालेलाल***
***म्हाळसा सुंदरी आरती करी***
***देवा ओवाळी नानापरी***
***खोबर्यांचा कुटका भंडार्याचा भडका***
***अडकलं भडकलं भडकलं हे भंडार***
***बोल बोल हजारी वाघ्या मुरळी***
***खंडोबा भगत सलाम सलाम***
***हर हर महादेव चिंतामणी मोरया***
***आनंदीया उदो उदो भरोबाचा चांगभलं***
***बोल सदानंदाचा येळकोट कडेपठार महाराज की जय***
***येळकोट येळकोट जय मल्हार***

या चंपाषष्टी दिनी खंडेरायास बाजरीची भाकरी व वांग्याचे भरीत नैवेद्य म्हणून दखवितात. तर कुणी गोड जेवणाचा प्रसाद म्हणून इतरांना, नातेवाईकांना जेवू घालतात. केलेल्या नवसाची परतफेड म्हणून जागरण-गोंधळ घालतात. केलेल्या इतिहासकालीन असाही उल्लेख सापडतो की, हे सातारा खंडेरायाचे मंदिर पाचशे ते सहाशे वर्षापूर्वीचे आहे. या मंदिराच्या आतमध्ये सातफुटी ताब्याची तलवार आहे. या मंदिराचा जीर्णोध्दार वीरमाता, राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर या तेजस्वी महान स्त्रीरत्नाने केलेला आहे. करीता आजच्या चंपाषष्टी दिनी खंडेरायाच्या चरणी नतमस्तक होऊन प्रसन्नचित्त व्हा.

मल्हारराव डोणगांवकर
संपर्क क्र. ९६३७९३७५७९



# कृषी विभागामार्फत लोकसहभागातून पळाशी येथे वनराई बंधारे

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील मौजे पळाशी येथे सोयगाव कृषी विभागाच्या वतीने तालुका कृषी अधिकारी एस जी वाघ. यांच्या मार्गदर्शनाखाली कृषि सहाय्यक राधिका सोळुंके व गावकरी यांनी पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून रब्बी हंगामात पिकांना व उन्हाळ्यात जनावरांना पाणी पिण्यासाठी उपलब्ध व्हावे याकरिता लोकसहभागातून कृषी विभागामार्फत वनराई बंधाऱ्याचे काम हाती घेण्यात आले होते. या कामी गावातील शेतकरी बंधूंनी कृषी विभागासोबत उत्स्फूर्त सहभाग घेऊन काम पूर्ण केले आहे. भविष्यात होणाऱ्या पाणीटंचाईवर मात केली आहे. यावेळी उपसरपंच सुभाष वाडेकर यांच्या हस्ते व गावातील प्रगतशील शेतकरी तसेच कृषि विभागातील कृषि पर्यवेक्षक हेमंत देशमुख, बि. टी. एम अमोल महाजन, कृषि सहाय्यक राधिका सोळुंके, संभाजी पाटील, जयश्री वाघ यांच्या उपस्थितीत जलपुजनाचा कार्यक्रम करण्यात आला. यावेळी शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# अभिनेता-दिग्दर्शक नीलेश मल्होत्रा यांच्या चित्रपटाला प्रचंड प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** अभिनेता, दिग्दर्शक आणि निर्माते नीलेश मल्होत्रा यांनी सध्या गोव्यात IFFI 2022 मध्ये सुरू असलेल्या NFDC फिल्म बाजारावर धडक दिली. मल्होत्रा यांनी मुख्य नायक म्हणून 5 बॉलीवूड चित्रपट आणि 3 हॉलीवूड चित्रपटांमध्ये काम केले आहे आणि टीव्ही अभिनेत्याने 15 हून अधिक शीर्ष टीव्ही शो केले आहेत आणि 35 हून अधिक उत्पादनांसाठी मॉडेलिंग केले आहे.

2008 मध्ये त्यांच्या मल्होत्रा प्रॉडक्शनच्या प्रोडक्शन हाऊसच्या अंतर्गत नीरज पाठक यांच्या मोहायर (मुख्य भूमिकेत नीलेश मल्होत्रा आणि शीबा, निक्की अनेजा, टॉम अल्टर आणि सुरेंद्र पाल) यांच्यासोबत त्यांनी निर्मिती केली तेव्हापासून त्यांचा चित्रपट निर्माता म्हणून प्रवास सुरू झाला. आणि संगीतकार श्रीकांत ठाकरे,

दिग्दर्शक म्हणून त्यांचा प्रवास 2013 मध्ये स्कॉटिश प्रॉडक्शन कंपनी मल्होत्रा प्रॉडक्शनने सह-निर्मित हंकी पंकी या त्यांच्या दुसऱ्या इंग्रजी चित्रपटाने सुरू केला. हॅन्की पँकीमध्ये, 95% पेक्षा जास्त स्कॉटिश लोक नॉन-अभिनेते होते, त्यांनी प्रमुख भूमिका बजावली आणि निर्मात्यांपैकी एक, या चित्रपटाचे दिग्दर्शन आणि अभिनयही त्यांनी केला होता. 2013 मध्ये कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये 88 देशांमधून आणि 50000 चित्रपटांमधून या चित्रपटाची निवड करण्यात आली होती. नीलेश मल्होत्रा आता त्याच्या 'मिस्टी पे' चित्रपटाचा दिग्दर्शक, अभिनेता आणि निर्माता म्हणून प्रिन्सेस 3रा चित्रपटाच्या प्रमोशनसाठी NFDC मध्ये आहे जो रिलीज होणार आहे. ते या चित्रपटाचे निर्माते असून त्यांनी दिग्दर्शन व अभिनयही केला आहे. सुखविंदर सिंग या चित्रपटाचे संगीतकार आहेत. आणि छायाचित्रणाचे दिग्दर्शक तीन वेळा ऑस्कर-नामांकित हॉलीवूड डीओपी जॅक कॉनरॉय आहेत. या चित्रपटात झीनत अमान, जावेद शेख, करण खन्ना, निकिता आनंद, रजत बेदी आणि नीलेश मल्होत्रा यांच्या प्रमुख भूमिका आहेत. मल्होत्रा प्रॉडक्शनच्या 'मिस्टी पे' चित्रपटाच्या वितरणाच्या उद्देशाने NFDC ने चित्रपटगृहात प्रवेश केला आणि त्याचे शूटिंग मलेशिया आणि भारतात झाले आहे. "मला प्रमुख वितरकांकडून उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला आहे आणि मला आशा आहे की सर्वोत्कृष्ट वितरकांमध्ये सहभागी होऊ शकेन. मला आणखी एक घोषणा करायची आहे ती म्हणजे मी फिल्म बाजार येथे एका स्पॅनिश निर्मात्याला भेटलो. जो सध्या द स्पॅनिश प्रिन्सेस ऑफ कपूरथला या चित्रपटाच्या संकल्पनेसह काम करत आहे.

# माजी केंद्रीय मंत्री तथा विद्यमान खासदार, अरविंद सावंत यांची अजिंठा लेणीला भेट

आधुनिक केसरी न्यूज

**फर्दापूर :** जगप्रसिद्ध अजिंठा लेणीमध्ये उद्धव ठाकरे शिवसेना गटाचे माजी केंद्रीय मंत्री तथा विद्यमान,खासदार अरविंद सावंत हे बुलढाणा जिल्ह्याचा दौरा करून दि. 25 नोव्हेंबर रोजी जगप्रसिद्ध अजिंठा लेणी बघण्यासाठी आले असता भारतीय पुरातत्व विभागाचे कर्मचारी, भगवान वराडे यांनी लेणी क्रमांक 1,2,4,9,10,12,16,17,19,26 या महत्त्वाच्या लेण्या बद्दल मार्गदर्शन केले. खासदार अरविंद सावंत यांनी आवर्जून बुद्ध लेणी मधील हस्तकला, शिल्पकला गौतम बुद्ध यांच्या जिवनावरील जातक कथा, खनिजा पासून तयार केलेली 2200 वर्षांपूर्वी ची पेंटिंग आज रोजी टिकून आहे. यावर माहिती घेऊन ते भारावून गेले. आपल्या महाराष्ट्र राज्यात इ.सन 500 शताब्दी मध्ये लेण्या कोरल्या हे आपले भाग्य आहे.राजे महाराजे यांनी त्यावेळी दान देऊन कोरीव काम केले. आज रोजी भारतीय पुरातत्व विभागाचे अधिकारी, कर्मचारी याची देखरेख व जतन करत आहेत स्वच्छता, सुद्धा चागल्या प्रकारची आहे. मी सर्वांचे मनापासून अभिनंदन करतो. अजून जास्तीत जास्त लेण्यावर भर देणे गरजेचे आहे.हा वारसा जतन करावा आपल्या महाराष्ट्र साठी अभिमानाची बाब आहे, असे त्यानीं बोलताना प्रतिक्रिया व्यक्त केली.यावेळी भारतीय पुरातत्व विभागाचे अधिकारी के.के.शेख,भारत काकडे, भगवान वराडे, सुरक्षा रक्षक गार्ड, फिलिप देसाई, कर्मचारी राजेंद्र बनसोडे, सलीम शहा, योगेश मोहिते, प्रविण तायडे, आदी उपस्थित होते.



# पहूर येथे श्रमसंस्कार शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** जामनेर तालुक्यातील पहूर येथे जागतिक वारसा स्थळ सप्ताह अंतर्गत पहूर येथे श्रीक्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर ट्रस्ट तर्फे उद्या शुक्रवार दि . २५ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ ते ११ यावेळेत मंदिर परिसरात श्रमसंस्कार शिबिर आयोजित करण्यात येणार आहे.

युनेस्को तर्फे दरवर्षी१९ ते २५ नोव्हेंबर दरम्यान जागतिक वारसा स्थळ सप्ताह साजरा केला जातो .या अंतर्गत वारसा स्थळांचे जतन संरक्षण , संवर्धन , स्वच्छता , जनजागृती अभियान राबविण्यात येते .याच अनुषंगाने पहूर येथील देवळी आणि गोगडी नद्यांच्या संगमावरील श्रीक्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर ट्रस्टतर्फे पहूर पोलीस स्टेशन , ग्रामपंचायत पहूर कसबे व गृप ग्रामपंचायत पहूर पेठ , सांगवी , खर्चाणे यांच्या सहकार्याने मंदिर परिसरात देवळी आणि गोगडी नद्यांचे संवर्धन , मंदिर परिसरातील कचऱ्याचे व्यवस्थापन , पुरातन वास्तूंचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले असून तरुणांनी -विद्यार्थ्यांनी या शिबिरात मोठ्या संख्येने सहभागी होऊन सामाजिक कार्यास भार लावावा , असे आवाहन श्री क्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिराचे पुजारी तथा ट्रस्टचे अध्यक्ष शिवभक्त रंगनाथ महाराज यांनी केले आहे .



## प्रणित अक्षय बाहेतीची विश्वविक्रमाला गवसणी

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** प्रणित अक्षय बाहेती



या अवघ्या पाच वर्षीय मुलाने विश्वविक्रमाला गवसणी घातली आहे. प्रणितने कमी वयात जास्तीत जास्त गणिताचे पाढे म्हणण्याचा विश्वविक्रम केला आहे. जागतिक विक्रमाची नोंदणी करणाऱ्या वर्ल्ड वाईड बुक ऑफ रेकॉर्ड्स या संस्थेच्या माध्यमातून एका मिनिटात जास्तीत जास्त पाढे म्हणण्याचा विश्वविक्रम नोंदविला गेला. वर्ल्ड वाईड बुक ऑफ रेकॉर्ड तर्फे विश्वविक्रम करण्यासाठी ८८० जणांनी भाग घेतला होता. यात प्रणित अक्षय बाहेती याने बाजी मारत विश्वविक्रमाला गवसणी घातली.

# जिल्हास्तरीय धनुर्विद्या स्पर्धेत फुले विद्यालयाला पाच पदके

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** जळगाव जिल्हा क्रीडा कार्यालय व जळगाव जिल्हा आर्चेरी असोसिएशन यांच्या संयूक्त विद्यामाने आयोजीत जिल्हास्तरीय शालेय आर्चेरी ( धनुर्विद्या ) स्पर्धेत पहूर येथील महात्मा फुले शिक्षण संस्था संचलित सावित्रीबाई माध्यमिक विद्यालयाने १ सुवर्ण पदकासह २ रौप्य व २ कांस्य अशी ५ पदकांची भरीव कमाई करत विभाग स्तरावर भरारी घेतली आहे. २३ नोव्हेंबर रोजी यावल तालुक्यातील फैजपूर येथील डी.एन.महाविद्यालयात जिल्हास्तरीय धनुर्विद्या स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून विभागावर निवड झाली आहे. शालेय क्रीडा स्पर्धा गेली तीन वर्षे कोरोना काळात बंद होत्या. या स्पर्धा न झाल्याने अनेक विद्यार्थी व खेळाडू शालेय क्रीडा स्पर्धांची आतुरतेने वाट पाहत होते. याच अनुषंगाने या वर्षी घेण्यात आलेल्या जिल्हा स्तरीय शालेय आर्चेरी स्पर्धेत अतिशय उस्फूर्त प्रतिसादात पार पडल्या. या स्पर्धेत सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाच्या ५ खेळाडूंनी सहभाग घेत आपली क्रिडा कौशल्य दाखवली. नंदिनी रमेश सोनवणे सुवर्ण, आंकाक्षा बळीराम जाधव रौप्य, सुमित विजय चौधरी - रौप्य, वैष्णवी दत्तू घोंगडे -कास्य, वैष्णवी भगवान सोनवणे - कास्य, प्राप्त करून विभागावर निवड झालेली आहे. त्यांना क्रिडा शिक्षक हरीभाऊ राऊत व जामनेर तालुका आर्चेरी असोसिएशनचे सचिव श्रीकृष्ण चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले.यशाबदल संस्थेचे अध्यक्ष बाबूराव आण्णा घोंगडे मुख्याध्यापिका श्रीमती व्ही. व्ही. घोंगडे, उपमुख्यध्यापिका के. ए. बनकर, वर्ग शिक्षीका एम. एच. बारी, सांस्कृतिक प्रतिनिधी शंकर भामेरे यांच्यासह शिक्षक -शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे कामाचा अहवाल अहवाल सुपूर्द

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** शिवसेना वैद्यकीय कक्षाचे मराठवाडा प्रमुख दादासाहेब थेटे यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची वर्ष निवासस्थानी भेट घेऊन मराठवाडा टीमच्या कामाचा अहवाल सुपूर्द केला. अहवाल पाहिल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कौतुकाची थाप पाठीवर टाकत शिवसेना वैद्यकीय कक्ष मराठवाडाच्या टीमला शुभेच्छा दिल्या. मुख्यमंत्री सहायता कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली मागील नऊ महिन्यात मराठवाड्याच्या टीमने केलेल्या आरोग्यसेवा कामाची माहिती अहवालाद्वारे मुख्यमंत्री साहेबांना दाखवण्यात आली. यामध्ये गेल्या नऊ महिन्यामध्ये मराठवाडा टीमच्या वतीने एकूण 16 नेत्र तपासणी आणि मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर राबवण्यात आले याद्वारे जवळपास दोनशेहुन अधिक मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्या. तर तीन हजाराहून अधिक रुग्णांची नेत्रतपासनी करण्यात आली. खासदार डॉ श्रीकांत शिंदे फाऊंडेशनच्या मदतीने मराठवाड्याच्या वेगवेगळ्या भागात 18 मोफत आरोग्य तपासणी आणि मोफत औषधी वाटप शिबिरे घेण्यात आली. याद्वारे पाच हजाराहून अधिक रुग्णांना लाभ झाला. तर मराठवाड्यातील कक्षाच्या पदाधिकऱ्यांच्या सहकार्याने वेगवेगळ्या भागात 22 रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले; तसेच 300 हुन अधिक रुग्णांना रक्तपिशव्या उपलब्ध करून देण्यात आल्या. कक्षच्या माध्यमातून 2 कॅन्सर तपासणी व उपचार शिबिरे, 2 हृदयरोग तपासणी आणि शस्त्रक्रिया शिबिरे, 4 आयुष्यमान भारत कार्ड नोंदणी शिबिरे, 8 रुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधीतून 7.5 लाख रुपयांचा निधी तर 7 रुग्णांना क्राऊड फंडिंगद्वारे 18 लक्ष रुपयांचा निधी मिळवून देण्यात आला आहे. 16 रुग्णांना डॉक्टरांच्या मदतीने मोफत शस्त्रक्रिया, 6 लहान बालकांच्या हृदयावरील मोफत शस्त्रक्रिया, 3500 हजार पेक्षा जास्त रुग्णांना MPJY योजना, PMJY योजना, समुपदेशन, दवाखान्यातील मदत, बेडस उपलब्धता, डॉक्टरांशी संवाद अशा वेगवेगळ्या स्वरूपाने मदत करणयात आली आहे. याबरोबरच मराठवाड्याच्या प्रत्येक जिल्हयात आणि तालुक्यात राज्य कक्षप्रमुख राम राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली पदाधिकारी नेमण्यात आले असून सामान्य रुग्णांसाठी सदैव निस्वार्थ सेवा करण्याचे काम संपूर्ण टीम करत आहे. अशी माहिती यावेळी थेटे यांनी दिली. यावेळी उमरीचे बांधकाम सभापती अनंतजी रॅपनवाड साहेब, नाशिकचे प्रथमेश पाटील, अनिकेत कुटे, साताऱ्याचे सुनील पाटील व इतर सहकारी उपस्थित होते.



मनोजवं मारुततुल्यवेगमं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।



श्री भद्रा मारोती औरंगाबाद

सौजन्य : जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुखःतू रामायण, सिमंत गल्ली, शहागंज गांधी पुतळ्याजवळ, औरंगाबाद. मो : 9422201977

# आ. बंब यांच्या उपस्थितीत भाजपची बैठक

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** भारतीय जनता पार्टीची संघटनात्मक बैठक शासकीय विश्रामगृह रत्नपूर (खुलताबाद) येथे आ. प्रशांती बंब साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व मा जिल्हाध्यक्ष विजय औताड़े याच्या प्रमुख उपस्थित पार पडली. आज भारतीय जनता पार्टी प्रमुख पदाधिकारी सर्व मोर्चा आघाड़ी व सेल चे अध्यक्ष शक्ति केंद्र प्रमुख बूथ प्रमुख या सर्वांचा आढावा घेण्यात आला या बैठकीत प्रामुख्याने येणाऱ्या ग्रामपंचायत निवडणूकी साठी प्रभारी बनवने, सर्व बूथ प्रमुखांनी विशेष कार्यकारी अधिकारी यांचे फॉर्म भरणे नवीन मतदार नोंदणी करने व 50 ते 100 वयोगटातील बोगस मतदार यादीतील नावे काढ़न्या बाबत अभियान राबावने , शिक्षक मतदार संघ नोंदणी अभियान राबावने , शक्ति केंद्र निहाय सोशल मीडिया प्रमुख नियुक्त करने , प्रत्येक बूथ वर व्हाट्सएप ग्रुप बनवने प्रत्येक बूथ वर मन की बात बूथ आरोग्य दूत, मतदार नोंदणी प्रमुख लाभार्थियोजना प्रमुख बनवने बूथ मधील 20 घरा मागे 1 पालक कार्यकर्ता नियुक्त करने , 26 नोवेम्बर संविधान सन्मान दिवसा निमित्त प्रत्येक गावत शाळा महाविद्यालय कार्यक्रम आयोजित करने ,धन्यवाद मोदीजी अभियान राबावने , वस्ती संपर्क अभियान राबावने सर्व पदाधिकारी यांनी स्वताचे ट्विटर एकाउंट, फेसबुक ,इंस्टाग्राम एकाउंट उगडून सोशल मीडिया मजबूत करने अश्या विविध विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

या बैठकित जिल्हाअध्यक्ष विजय औताड़े,लोकसभा सहप्रभारी समीर राजुरकर महिला मोर्चा अध्यक्ष पुष्पा ताई काळे ओबीसी मोर्चा जिल्हा अध्यक्ष का युवा मोर्चा प्रदेश पदाधिकारी हर्षवर्धन कराड, अल्पसंख्यक जिल्हाअध्यक्ष हाकिम भाई पहेलवान जिल्हा सरचिटणीस भाऊराव मुळे भाजपा तालुका अध्यक्ष प्रकाश वाकळे , मा सभापती दिनेश भाऊ अंभोरे जिल्हा परिषद उपाध्यक्ष L G गायकवाड़, भिमराव खंडागळे,सभापति गणेश नाना आधाने उप सभापति प्रभाकर शिंदे शहर अध्यक्ष सतीश दांडेकर, नगरसेवक योगेश बारगळ, नगरसेवक परसराम बारगळ, तालुका सरचिटणीस अविनाश कुलकर्णी, गणेश हजारी, राजू ठेगड़े सत्तार पटेल, सुखदेव ठेगड़े, विलास काळे, संतोष राजपूत सुरेश मालोदे, अविनाश वेताळ, मनोज गुलवे, अनिल करपे, राजू राठोड, सुभाष ठोंबरे, विकास कापसे, ज्ञानेश्वर नलावडे, गणेश जुरावत, विजय चंदवाड़े, सतिश खंडागळे, विजय जाधव, बाळु नलावडे, आशोक खंडागळे, राहुल चव्हाण, सतिश जैस्वाल, प्रशांत गदानकर, द्वारकादास जाधव, बाबासाहेब औटे, हरिदास म्हसकर, कृष्णा चव्हाण, आप्पाराव वाकळे, संतोष जेठे, आरूण हिवर्डे, आमोल गावळी, गणेश सावजी, उमेश आवारे, किशोर भावसार, राहुल हजारे, मोहन तुपे, बशीर शेख, हकिम भाई, सय्यद आझोरोददिन, सय्यद अफसर, मुकतार पठाण, निलेश हरणे, सौरभ खंडेलवाल, राजेंद्र राठोड, प्रेम राठोड, बबन वर्दे, बंडु शिंदे, सुरेश जाधव, आजिनाथ जाधव, गोविंद काळे, नंदकुमार चव्हाण, रामेश्वर होळकर, गणेश भानुदास वाकळे, सुनिल वाकळे,महिला तालुकाध्यक्ष सुनिता दिवेकर, तसेच तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# शेतकऱ्यांची गळफास घेऊन आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा. :** जळगाव जामोद तालुक्यातील निमकराड येथील रहिवासी असलेले



कर्जबाजारी शेतकरी कैलास दशरथ वावरे वय ६२ वर्ष हे दिनांक २३ नोव्हेंबर रोजी दुपारी दोन वाजेदरम्यान शेतात काम करीत असताना पत्नीला कुऱ्हा येथे बाजार आणायला जातो असे सांगुन शेतातून निघून गेले व संध्याकाळपर्यंत घरी पोहोचलेच नाहीत, सगळीकडे शोधाशोध केली असता ते मिळून आले नाहीत. दुसऱ्या दिवशी दिनांक 24 नोव्हेंबर रोजी सकाळी शोध घेत असताना निमकराड शिवारातील शेतामध्ये कैलास वावरे हे गळफास घेतलेल्या स्थितीत आढळून आले. नातेवाईकांनी संबंधित घटनेबद्दल गावचे पोलीस पाटील रामधन मोरे यांना फोन करून सांगितले कैलास दशरथ वावरे हे निमकराड शिवारांमधील शेतात झाडाला फाशी घेतलेल्या स्थितीत मिळाले आहेत. पोलीस पाटील यांनी जळगाव जामोद पोलीस स्टेशनला माहिती दिली घटनास्थळी जळगाव पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक किशोर घोडेस्वार पोलीस कॉन्स्टेबल विनोद इंगळे यांनी घटनास्थळी धाव घेऊन घटनेचा पंचनामा केला असून जळगाव पोलीस स्टेशनला मर्ग दाखल केला आहे. कैलास वावरे यांचेकडे सेंट्रल बँक ऑफ इंडिया संग्रामपूर शाखेचे 90 हजार रुपये कर्ज थकीत आहे त्यामुळे त्यांनी आत्महत्या केल्याची चर्चा आहे आत्महत्या का केल. मृतक शेतकऱ्यास,पत्नी, तीन मुले, एक विवाहित मुलगी असा आप्तपरिवार आहे.

# वऱ्हाड निघाले खेड्याला हे एक पात्री नाटक देवेंद्र फडणवीस यांना जमले : प्रकाश सोळंके जिल्हाध्यक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** यापूर्वी ज्या ज्या पक्षाने सत्ता सत्ता भोगले



त्या पक्षाने शेतकऱ्यांना पाणी रस्ते वीज देऊ असे सांगून आता भोगत आहेत, या महाराष्ट्राला मनसे अध्यक्ष राज साहेब ठाकरे यांच्या सारख्या नेत्याची गरज आहे, कारण सध्या रब्बी पिकांचे हंगाम असल्यामुळे शेतकऱ्यांना नोटीसा देऊन महाविज वितरण कंपनी अनेक वर्षापासून थकबाकीत असलेल्या शेतकऱ्यांचे सक्तीने बिल वसुली करीत आहे, गहू ज्वारी हरभरा इतर रब्बी पिकांच्या हंगामात दरवर्षी यांचा हा लुटालुटीचा खेळ चालू असतो. या महावीज वितरण कंपनीच्या या खेळाविरुद्ध राजकीय नेते सुद्धा अप्रत्यक्ष सहभागी असतात कारण सत्तेत एक बोलायचे सत्य आल्यावर एक बोलायचं खरे तर जी.एस.टी सारख्या करा पोटी अनेक स्वरूपात केंद्र सरकारला कर देणारे राज्य म्हणजे देशातील सगळ्यात मोठे राज्य महाराष्ट्र राज्य आहे. या महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांना २४ घंटे वीज उपलब्ध व्हायला हवी, कारण वाढती लोकसंख्या पाहता शेतकऱ्यांना दोन शिफ्ट मध्ये शेती करावी लागते. जो पर्यंत या देशातील शेतीचा पूर्णपणे विकास होणार नाही, शेती विकसित होणार नाही तो पर्यंत आपण महासत्ता वगैरे बोलणे बरोबर नाही. परंतु ही गोष्ट खरी आहे की जनतेच्या लक्षात आले नाही, जोपर्यंत जनता योग्य नेतृत्वाला मतदान करीत नाही तो पर्यंत जनतेचा विकास होणार नाही, छत्रपती शिवरायांच्या महाराष्ट्रामध्ये सतेत असणारे सत्तेच्या बाहेर असणारे सत्ता मिळण्यासाठी जे खोटं बोलून वक्तव्य करतातण. सत्ता आल्यानंतर त्या लोकांची टिंगल टवाळी करुन प्रश्नांची उडवा उडवी केले जातात, म्हणून एक दिवस या महाराष्ट्रातील जनतेच्या लक्षात येईल आपल्याला अनेक वर्षापासून काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय जनता पार्टी, सेना सारख्या सगळ्या पक्षांनी सत्ता भोगले शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लावले नाही ही पक्ष फसवणूक नाही का, कारण आपण शेतकऱ्यांनी कोणाला मतदान केले पाहिजे हि गोष्ट लक्षात आली पाहिजे. कारण सरकारमध्ये नसताना सत्तेच्या बाहेर असतानी अनेक उदाहरणे देऊन उत्तर प्रदेशातील सरकारने शेतकऱ्यांच्या बिलाचे पैस सांगता शेतकऱ्यांना विद्युत पुरवठा वीज कनेक्शन न तोडता शेतकऱ्यांना वीस द्या अशी मागणी करतात. परंतु सत्तेत आल्यानंतर शेतकऱ्यांना सांगता आत्ता पैसे भरावे लागते कारण महावीर वितरण कंपनी चालवायला पैसे लागतात, म्हणून म्हणतो स्वर्गीय जगप्रसिद्ध नाट्य कलाकार लक्ष्मण देशपांडे यांचे वऱ्हाड निघाले लंडनला नाटका पेक्षा ही सुपरहिट एक पात्री नाटक आपल्याला जमले राव खूप छान. देवेंद्र म्हणून अनेक वर्षापासून वीज वितरण कंपनी शेतकऱ्यांना त्रास देत आहे, महाबीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्याने थकीत बिलाच्या नावाखाली शेतकऱ्यांना वेठीस धरून सक्तीने वसुली करीत आहे, काही ठिकाणी तर वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी निवेजीत कट रचून रेगुलर बिल भरणाऱ्या शेतकऱ्यांना डिफॉल्टर करायचे आणि हप्ते खोरी चालू होते. मग शेतकऱ्यांकडून वैयक्तिक पैसे वसूल करायचे हा धंदा चालू होतो, म्हणून फडवणीस यांच्या दुटप्पी धोरणाच्या विरोधात लवकरच मराठवाड्यातील जालना जिल्ह्यासह परतूर मंठा तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना नेते दिलीप बापू धोत्रे यांच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन छेडणार असे ही माहिती सोळंके यांनी दिली.


# एमजीएम विद्यापीठाची प्रथम "डी.लिट" अण्णा भाऊंना

## अण्णा भाऊंना मानद म्हणजे देशातील साहित्याचा गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**संदीप मानकर**

**औरंगाबाद :** महाराष्ट्राच्या जडणघडणीत साहित्य आणि



विचारांच्या माध्यमांतून परिवर्तन चळवळ उभी करणारे आणि संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत ज्यांचे महत्वपूर्ण योगदान राहिले ते साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर पंडित पदवी (डी.लिट) पदवी देऊन त्यांचा सन्मान केला जाणार आहे. एमजीएम विद्यापीठाच्या अंतर्गत पहिल्या पदवीदान समारंभाचा कार्यक्रम आज ता.27 नोव्हेंबर रोजी येथील रुक्मिणी सभागृहात संपन्न होणार असून, अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष, प्रसिद्ध शास्त्रज्ञ तथा पदमविभूषण अनिल काकोडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत व त्यांच्या हस्ते अण्णा भाऊंच्या स्नुषा सावित्रीबाई मधुकर साठे यांना ही पदवी प्रदान केली जाणार आहे. याप्रसंगी विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.विलास सपकाळ, परीक्षा नियंत्रक डॉ.कर्नल प्रदीपकुमार, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.रेखा शेळके उपस्थित राहणार असून यांसोबतच मातंग समाजातील विविध सामाजिक संघटनांचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांची देखील या कार्यक्रमास उपस्थिती असणार आहे. याच कार्यक्रमात 534 विद्यार्थ्यांना पदवीदान होणार असून चान्सलर्स गोल्ड मेडलचे देखील वितरण होणार आहे.

**डॉ .आंबेडकर विद्यापीठाला अण्णाभाऊंना असे काही द्यायची ईच्छा झाली नसल्याची खंत**

साहित्यक्षेत्रात विपूल ग्रंथसंपदेचा साठा असणारे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची कदर एमजीएम विद्यापीठाने केली परंतु, बहुजनांच्या शिक्षणाचे व वंचितांचा आवाज असणारे मराठवाड्यातील डॉ .बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद हे मात्र अशा प्रकारचं काहीही साहित्यरत्न अण्णाभाऊंच्या च्या नावे देऊ शकले नाही अशी खंत साहित्य क्षेत्रातील विचारवंतांनी व अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केली .



# नाटक ही मोठी जिवंत आणि थरारक गोष्ट असते याचा प्रत्यय 'हैवान' या नाटकाने पुन्हा एकदा दिला

विनोद जैतमहाल
संपर्क क्र. 9823028332

आधुनिक केसरी

**नाट्यांकुर जालना या संस्थेच्या वतीने सुमीत शर्मा लिखित व दिग्दर्शित 'हैवान' या दोन अंकी नाटकाचा प्रयोग 21 नोव्हेंबरला राज्य नाट्य स्पर्धेत औरंगाबाद केंद्रावर आम्ही सादर केला (आणि आता आम्हीच त्यावर लिहीत आहोत.) सत्तेच्या लोभापायी माणूस हैवान होतो. हा हैवान वाटेत येईल त्याचा मुडदा पाडायला कचरत नाही. ही नशा जगातील कुठल्याही नशेपेक्षा भयंकर आहे आणि यावर उताराही नाही. शेक्सपिअरच्या शोकांतिकेची आठवण करून देणारे हे नाटक सुमीत शर्मा यांनी मोठ्या कौशल्याने लिहिले आहे.**

आधुनिक केसरी

मराठवाड्यातल्या एका गावात बापू नावाचे शोषक सत्ताकेंद्र आणि त्याच्या भोवतीच्या विचित्र माणसांची ही गोष्ट आहे. शोषणाला विरोध करणाऱ्या प्रत्येकाला दुष्ट बापू खतम करत असतो. हे काम करणारा त्याचा खास माणूस असतो 'आमुश्या'. हा आमुश्या नपुंसक असतो. त्याच्या बायकोशी बापू राजरोस अनैतिक संबंध ठेवून असतो. याचा राग आमुश्या व त्याची बायको लाली यांच्या मनात सतत धुमसतो. एकदा गावाबाहेरच्या जंगलात राहणारी एक विक्षिप्त म्हातारी आमुश्याला भविष्य सांगते की "जो नामर्द हाय तो राजा होनार हाय." मात्र नंतर आमुश्या शहरातल्या डॉक्टरकडून उपचार घेऊन नपुंसकतेवर मात करतो. ही बातमी तो लालीला सांगतो. आपण आईबाप होणार याचा आनंद दोघांनाही होतो. मात्र आता लालीची महत्त्वाकांक्षा फणा वर काढते. "बापूचा खून करू आणि सत्ता हाती घेऊ" असे सांगून ती आमुश्याला भरीस घालते. त्यानुसार ते दोघे बापूला घरी बोलावून त्याचा खून करतात.
आता आमुश्याच्या हाती सत्ता येते. परंतु तोही बापूच्याच जुलमी वाटेने जाऊ लागतो. खुर्चीचा दावेदार असलेल्या पिंटू पैलवानाला मारायच्या नादात त्याचा बाप मारुतीचा खून आमुश्याच्या हातून होतो. जाब विचारायला आमुश्याच्या घरी आलेल्या बापूच्या बायकोवर म्हणजेच लक्ष्मीवरही आमुश्या बलात्कार करतो. हे पाहून आमुश्याची बायको लाली जंगलात जाऊन आत्महत्या करते. आमुश्या वेडापिसा होतो. इकडे बापूचा खास माणूस नारायण, त्याची मुलगी ट्विंकल, तिचा प्रियकर पिंटू पैलवान आणि बापूचा मुलगा सँडी हे सर्व जण मिळून आमुश्याचा काटा काढण्याचा कट करतात. पण आमुश्या या सर्वांना पुरून उरतो. तो गावाबाहेरच्या विक्षिप्त म्हातारीकडे जाऊन तिच्या भविष्याची खिल्ली उडवतो.



तेव्हा म्हातारी म्हणते की, आता गावात लवकरच 'हैवान' येणार आहे. हा हैवान कोण असतो आणि त्याचे पुढे काय होते. हे नाटकाच्या शेवटी अत्यंत भेदकपणे अंगावर येते. म्हातारीजवळचा वेडसर मुलगा राजकुमार, पिंटू पैलवान आणि ट्विंकलची लव्ह स्टोरी, आंदोलन करणारा मंगेश अशा अनेक उपकथा घेऊन हे नाटक पुढे जाते आणि शेवटी प्रचंड शिट्या आणि टाळ्यांच्या गजरात संपते. (पण तोपर्यंत प्रेक्षकांच्या दिमागाचे दही झालेले असते.) विक्षिप्त म्हातारीची भूमिका खुद्द लेखक आणि दिग्दर्शक सुमीत शर्मा यांनीच केली आहे. या म्हातारीचे लटपटत चालणे, जटांमधून रोखून पाहणे, गूढ बोलणे आणि भयंकर नाचणे केवळ अप्रतिम! राजकुमार झालेल्या गणेश लोखंडेनेही म्हातारीच्या विचित्रपणात भर घातली. सतीश लिंगडे यांनी लंपट, शोषक, अंग कराकरा खाजवणारा किळसवाणा बापू लीलया साकारला. रेखा चव्हाण यांनी लालीच्या अनेक छटा बारकाईने दाखवल्या. बेरकी नारायणच्या भूमिकेत सुंदर कुँवरपुरिया हे वेगळेच रसायन घेऊन येतात, तर मुकुंद दुसे यांचा मुद्राभिनय आणि मरणे एकदम कातिल! राहुल काळे याने मंगेश आणि पिंटू पैलवान या दोन्ही व्यक्तींचे रंग वेगवेगळे दाखवून स्वतःची क्षमता सिद्ध केली. तेजस्विनी वाघमारे हिने चतुर ट्विंकलची भूमिका सहज निभावली तर प्रेरणा सराफ कुलकर्णी यांची पीडित, निराश लक्ष्मी लक्षवेधी होती. बापूचा वाया गेलेला दिवटा म्हणून पवनकुमार खांदे आणि गावकरी म्हणून सोहन भुरेवाल, अथांग लिंगडे यांचेही खारीचे वाटे यात आहेतच. सर्वात उल्लेखनीय म्हणजे सुनील गव्हाणे या कलाकाराला आमुश्याची मोठी भूमिका साकारण्याची संधी मिळाली आणि या विनम्र अभिनेत्याने संधीचे सोनेच केले.
कामगार कल्याण केंद्राच्या हॉलमध्ये तालमी सुरू असताना त्याची प्रामाणिक मेहनत आम्ही रोज पाहत होतो. प्रत्यक्ष नाटकात तर त्याने अक्षरशः रंगमंच हादरवून टाकला.
या नाटकाला आनंद घुले आणि ओंकार सुलाखे यांनी दिलेले लाइव्ह संगीत करुण आणि तितकेच आग लावणारे होते.
कमी तालमी होऊनही आदित्य मुदिराजने रेकॉर्डेड संगीताची जबाबदारी अचूक पार पाडली. नेपथ्यामधले ओंडके, दगड, झोपडी, म्हातारीची नागमोडी काठी वगैरे भयंकर गोष्टी बनवणारे मुकुंद दुसे आणि संजय भिंगारे यांच्या परिश्रमांनाही सलाम!
साक्षी नरवडेची रंगभूषा आणि वैभव भालेरावची वेशभूषा दोन्ही नाटकाच्या कथेसारखेच खतरनाक होते.
प्रकाश योजनेसाठी ओंकार बिनीवाले आणि मी समोरच बसलेलो होतो. नाटकाला वीस दिवे लावलेले होते. कोणता दिवा कोणत्या बटनावर लागतो याची उजळणी आम्ही बराच वेळ केली. मग नाटक सुरू झाले. तरीही नाटक आम्ही तटस्थपणे पाहू शकलो नाही. एखाद्या विहिरीने माणसाला आत ओढावे तसे हे नाटक आम्हाला खेचून घेत होते. एक खास टिपः 'हैवान' हा अरबी शब्द आहे. त्याचा अर्थ 'जनावर' असा आहे. मात्र त्याचा दुसरा अर्थ 'मूर्ख व्यक्ती' असाही आहे."सत्तेला चटावलेला माणूस मूर्खासारखा वागतो किंवा मूर्खालाच सत्तेची हाव जास्त असते" हे सत्य या नाटकाने अधोरेखित केले हे जास्त महत्त्वाचे!

# गोविंदप्रभूंचे मानवतेचे आचरण हेच समाज प्रबोधन

आधुनिक केसरी न्यूज

**नेर :** आज ज्या अर्थाने आपण समाजप्रबोधन हा शब्द योजतो त्याचा अर्थ श्री गोविंद प्रभूंच्या कृती आचरणात शोधता येतो. महानुभावीय ग्रंथात भाषिक सांस्कृतिक संपन्नता आहे . यापैकी लीळाचरित्र ग्रंथात ' राऊळ माय राऊळ बाप 'असे कारुण्य पदोपदी जाणवे. गोविंदप्रभूंचे मानवतावादी प्रत्यक्ष आचरण यातूनच त्यांचे समाज प्रबोधन प्रतीत होते, असे प्रतिपादन संत साहित्याचे अभ्यासक डॉ. रमाकांत कोलते यांनी केले. ते संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ महानुभाव अध्यासन केंद्राच्या वतीने आयोजित तपस्वी तुळशीरामजी मेश्राम स्मृती सर्वज्ञ चक्रधर स्वामी व्याख्यानमालेत नेहरू महाविद्यालय नेरपरसोपंत येथे बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रवीण बनसोड होते. मंचावर महंत डॉ. सोनपेठकर सुश्री केशरताई मेश्राम सुभाष पावडे संस्थेचे सदस्य डॉ. संजय काळे हे उपस्थित होते. विद्यापीठाने महाविद्यालयाकडे सोपविलेल्या कार्यक्रमानुसार प्रस्तुत व्याख्यानमालेत गोविंदप्रभूंचा लोकजागर या विषयाचे व्याख्यानपुष्प गुंफताना डॉ. कोलते यांनी गोविंद प्रभू यांच्या जीवनातील विविध पैलू उलगडून दाखविले. तल्लख



कुशाग्र बुद्धीचे गोविंद प्रभू यांच्या मनात स्त्रियांबद्दल अपार आपुलकी होती. स्त्रियांमध्येही गोविंद प्रभू बद्दल पराकोटीचा विश्वास होता. चक्रधर स्वामी संत नामदेव संत तुकाराम आचार्य विनोबा भावे यांच्या विचारांचे अनेक दाखले देत डॉ. कोलते यांनी विषयाच्या अनुरोधाने सखोल मांडणी केली. थॉमरसेट मॉम यांच्या उक्तीप्रमाणे चांगला वाचकच चांगला लेखक होतो असा सल्ला वाङ्मयाच्या विद्यार्थ्यांना त्यांनी दिला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महामानवांच्या प्रतिमांना आणि लीळाचरित्र या ग्रंथाला वंदन करून पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी प्रास्ताविक डॉ. महंत सोनपेठकर यांनी केले ऑल इंडिया रेडिओच्या निवृत अधिकारी आणि महानुभव पंथाच्या प्रसारासाठी आपले जीवन व्यतीत करीत असलेल्या सुश्री केशरताई मेश्राम यांनी शुभेच्छा पर विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.प्रवीण बनसोड आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की , साहित्याचा आद्य स्त्रोत महानुभाव पंथातील लीळाचरित्र महदंबेचे धवळे हे ग्रंथ आहेत. चक्रधर स्वामी यांनी गुजरात पासून इतर प्रदेशात तर दक्षिणेत महात्मा बसवेश्वर यांनी प्रबोधनाची अखंड ज्योत तेवत ठेवली. विशेष म्हणजे सामान्य माणसांना कळेल अशा लोक भाषेत त्यांनी आपले तत्त्वज्ञान मांडले.
व्याख्यानमाला कार्यक्रमाच्या औचित्याने मराठी वाङ्मय अभ्यास मंडळाचे उद्‌घाटन पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी गुणरत्न कांबळे (अध्यक्ष) मोहिनी उघडे (उपाध्यक्ष) निकिता दुधे (सचिव) गिरीश खोब्रागडे(सहसचिव ) प्रद्युम्न भोसले (कोषाध्यक्ष )तसेच प्रियांका ढोके वैष्णवी कावरे अभिषेक बावणे वैष्णवी कराळे साक्षी कोल्हे या सदस्यांसह कार्यकारिणी घोषित करण्यात आली. पाहुण्यांचे स्वागत डॉ.एम. डी. वडते प्रा. एम.यू. अर्जुने डॉ. शीतल जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन व्याख्यानमालेचे संयोजक डॉ. शांतरक्षित गावंडे यांनी तर आभार प्रा.पंकज चव्हाण यांनी मानले.



# साई पर्ल सोसायटीच्या ज्येष्ठांनी घेतला निसर्ग पर्यटनाचा आनंद

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** हिरवाईने नटलेल्या डोंगर - टेकड्या, हवीहवीशी वाटणारी गुलाबी थंडी, सभोवताली पसरलेली धुक्याची चादर, प्रातःसमयीच्या उन्हातील कोवळ्या सोनेरी किरणांची ऊब अशा आल्हाददायी वातावरणाच्या अनुभूतीचा आनंद येथील पिंपळे सौदागर मधील साई पर्ल सोसायटीतील ज्येष्ठ नागरिकांनी घेतला. सोसायटीतील श्री. व सौ. नांदगावकर, कुलकर्णी, काटे, कांबळे, माने, राऊत, सुपे आणि श्रीमती भाटिया या ज्येष्ठांनी वाई, पाचगणी,महाबळेश्वर परिसरात निसर्गरम्य सहलीचे नुकतेच आयोजन केले होते. वयाची साठी पार केलेल्या या ज्येष्ठांनी उत्स्फूर्त उत्साहात नाच - गाणी सादर करुन या सहलीची रंगत वाढवली. दोन दिवसीय सहलीत वाईचा गणपती, पंचगंगा नदीचे गोमुख, पेशव्यांचा वाडा, पुस्तकांचे गाव भिलारे तसेच महाबळेश्वर परिसरातील आर्थर पॉईंट, इको पॉईंट, एलिफंटा पॉईंट, टेबल लॅंड याठिकाणी या ज्येष्ठांनी भेटी दिल्या. विशेष म्हणजे या सहलीत कॅम्प फायरचे आयोजन करुन थंडीच्या वातावरणात गप्पा गोष्टींच्या जोडीला नाच - गाणी सादर करुन या ज्येष्ठांनी धमाल केली.

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी,
वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.
नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in